सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

मासिक

# नवस्नेह



ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ९ वे : अंक ४


जुलै २०२३

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु

गुरुर्देवो महेश्वरः ।

गुरु साक्षात परब्रह्म

तस्मै श्री गुरवे नमः ।।



प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**


४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,

कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५

Visit us on www.kolhapurchitpavan.com

ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com

https: //www.facebook.com/kolhapurchitpavan



# विमान उड्डाणाची आकर्षक प्रात्यक्षिके






रविवार, दि. २१ मे २०२३ रोजी कोल्हापूर जिल्हा ब्राह्मण संघाने 'डेमॉन्स्ट्रेशन अ‍ॅन्ड फ्लाईंग ऑफ एरोप्लेन' हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम आयोजित केला होता. सर्व ब्राह्मण संघ आणि संस्थांनी या कार्यक्रमाचा प्रचार आपापल्या व्हॉटस्‌अ‍ॅप ग्रुपवरून करून सभासदांची नाव नोंदणी केल्यामुळे कार्यक्रमासाठी जवळपास ३०० मुले-मुली आणि त्यांचे पालक उपस्थित होते. शेंडा पार्क येथील खुल्या मैदानात सकाळी ७ ते १० या वेळेत हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमानंतर अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

कोल्हापूर चित्पावन संघाचे उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांनी कार्यक्रम सादर करणाऱ्या 'कोल्हापूर एरोमॉडेलिंग असोसिएशन'चे डॉ. दिनेश कित्तूर, श्री. अविनाश पांचाळ, सनीत निहाल तनुजा, देवेन माने, सुनिल भाईक, सैफ जावेद, डॉ. नईम खातिब, विद्यानंद उपाध्ये, संग्राम, प्रमोद करजुले, अजिंक्य दीक्षित, डॉ. सुभाष मशाल यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर त्यांनी विमानाची विविध प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांच्या विज्ञानविषयक जाणीवा विकसित केल्या. सर्व उपस्थितांनी त्याबद्दल या मंडळींचे आभार मानले.

या कार्यक्रमाला इंडियन नेव्हीचे फायटर आणि टेस्ट पायलट कमांडर श्री. अमित कवाडे हा आवर्जून उपस्थित होते. त्यांचे जिल्हा ब्राह्मण संघातर्फे आभार ! तसेच कार्यक्रमाच्या सादरकर्त्यांचे आणि श्री. आदित्य जोशी यांचेही आभार !




## श्रीमती अर्चना पाटणकर यांचे उत्तुंग यश

अर्चना बाळकृष्ण पाटणकर, वय ६३ यांनी जिल्हा परिषदेतील हेल्थ व्हिजीटर या नोकरीतून स्वेच्छा निवृत्ती घेऊन नंतर आपल्या आवडीनुसार गीता अध्ययन करण्याचा छंद जोपासला. भगवद्‌गीतेचे प्राथमिक ज्ञान राधाकृष्ण मंदिर येथे श्री. भावेकाका यांचेकडून प्राप्त केले आणि गीता परिवारमध्ये प्रवेश केला. गीता गुंजन, जिज्ञासू, पाठक, पथिक अशा क्रमाने गीताव्रती हा शेवटचा टप्पा गाठून त्या परीक्षेत उत्तुंग यश प्राप्त केले. शुद्ध उच्चारांसह संपूर्ण गीतेचे ७०० श्लोक मुखोद्‌गत करून 'गीताव्रती' ही अंतिम पदवी ६०० पैकी ५९८ गुण मिळवून प्राप्त केल्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !

गीताप्रेमी व भक्तांसाठी तसेच जिज्ञासूंना त्यांच्या ९४०३२३५०८२ या क्रमांकावर त्यांचेशी संपर्क साधून त्यांचे मार्गदर्शन घेता येईल.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ९ वे : अंक ४ : जुलै २०२३**



- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** श्री. पुष्कर ताम्हनकर 9890737221
  सौ. पल्लवी देशमुख 9420455984


**अनुक्रम**


१) **संपादकीय** /४

२) **आम्ही कृष्णसख्या – 'मीरा'** /५
   – ज्योत्स्ना शिंत्रे

३) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / ८
   – सौ. मंजुश्री गोखले

४) **झाशीची राणी–महाराणी लक्ष्मीबाई** / ९

५) **म्हणींचे म्हणणे** /१० – वैदेही जोशी

६) **मुलांचे पान** / १२

७) **ज्ञानसूर्याची सावली** /१४
   – सौ. मंजुश्री गोखले

८) **संगीताच्या बागेतले ब्रह्मकमळ**
   **वसंतराव देशपांडे** /१७

९) **रक्तदाता शतकवीर** /२२
   – सौ. नीता चंद्रकांत गोगटे

१०) **शैक्षणिक पारितोषिक योजना निवेदन** /२४

११) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स,
  १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
  मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे
  विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस,
  कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०






सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१–२५४६२२५
०२३१–२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष)
0231–2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी**
**'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ११ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

आला ना पाऊस ? तो येणारच होता. फक्त आता त्याने अतिरेक करू नये म्हणजे झालं ! अर्थात तो काही आपला चाकर नाही. आपल्या मर्जीप्रमाणं पडायला. पण तरी आपण प्रार्थना नक्कीच करू शकतो. पावसाबद्दल बरीच गाणी आहेत. पण एक हिंदी शेर आहे.

**'ए बारिश जरा थम थम के बरस**

**इतना ना बरस कही वो आ न सके ।**

**वो आने के बाद इतना बरस**

**की कही वो जा न सके ।**

हे इथपर्यंत पावसाचं पडणं मान्य आहे. पण महापूर आणि धुमाकूळ ? नको, नको ! अर्थात 'त्याच्या' मनात असेल तरंच तो करेल म्हणा !

याच महिन्यात अधिक महिना येतो आहे. अधिक महिना आणि तोही श्रावण.

अधिकस्य अधिकम् फलम् म्हणतात. ते या वर्षी मिळणार वाटतं ! अधिक चांगली पिकं, अधिक चांगली फळं, अधिक चांगली व्रतं, अधिक चांगली समृद्धी आणि अधिक चांगली बुद्धी सुद्धा ! आणि हो ! अधिक चांगला 'नवस्नेह'! अर्थात तो तर आम्ही करतोच. या अंकातही गानतपस्वी गै. वसंतराव देशपांडे यांच्यावरचा अप्रतिम दीर्घ लेख दिला आहे. संगीताच्या अभ्यासकांना आणि चाहत्यांना तो आवडेलच, पण संगीत रसिकांनाही तो नक्की आवडेल. याशिवाय इतर नेहमीच लोकप्रिय सदरेही आहेतच. आणि आता तर या महिन्यापासून आम्हाला नवस्नेहच्या दिवाळी अंकाचे वेध लागतात. तोही अंक देखण्या स्वरुपातच काढायचा आहे, नेहमीप्रमाणं. अर्थात आपली परंपराच तशी आहे म्हणा. तेव्हा उचला लेखणी आणि लिहा कसदार साहित्य आपल्या दिवाळी अंकासाठी ! कधी लिहिलं नसलं तरी लिहा. आत्ता सुरुवात करा. अपनी आँख खुलती है, तभी सवेरा होता है । आणखी एक

**उस पछतावे के साथ मत जागिये**

**जिसे आप कल पूरा नही कर सके ।**

**उस संकल्प के साथ जागिये**

**जिसे आपको आज पूरा करना है ।**

तेव्हा आम्ही वाट बघतोय तुमच्या कसदार साहित्याची ! आणि हो, अभिप्रायाची सुद्धा !

आजकाल सगळ्याला 'हॅप्पी' लावायची पद्धत आहे. कशालाही ! जाऊ दे उदाहरण देत नाही, असभ्य वाटेल ! पण मी म्हणून टाकते.

हॅप्पी पावसाळा ! धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,

**सौ. मंजुश्री गोखले,**

मोबा. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# आम्ही कृष्णसख्या - मीरा

**(लेखांक सहावा)**

मीराबाई इ.स. पंधराशेमधील एक महान कृष्णभक्त स्त्री होती. इतकी वर्षे होऊन गेली तरी तिच्या कृष्णभक्तीचा महिमा कायम आहे. तिची प्रेमभक्तीने ओतप्रोत असलेली भजने आजही लोक तितक्याच आवडीने, प्रेमाने गात असतात. मीरा म्हणजे कृष्णभक्तीचा आदर्श, अशी तिची प्रतिमा आजही लोकमानसात कायम आहे आणि ती कायमच राहील.

मीराबाईचा जन्म राजपुताना (म्हणजे आजचे राजस्थान) मधील मेडता गावात झाला. तिचे वडील रतनसिंह राठोड आणि आई वीरकुमारी. ती एका खानदानी राठोड, जहागीर कुटुंबात जन्मली होती, पण वाढली ती तिच्या आजी – आजोबांजवळ. तिचे आजोबा राठोड रावददु सिंह मेडता येथील जहागीरदार होते, तर वडील रतनसिंह हे बाजौलीचे जहागीरदार होते.

मीरेची आजी एक महान कृष्णभक्त होती. तिच्यामुळे मीरेवर अगदी लहानपणापासून कृष्णभक्तीचे अमीट संस्कार झाले. एक दिवस एक लग्नाची वरात जात असताना मीरेने आपल्या आजीला विचारले, 'माझा पती कोण? माझे लग्न कुणाशी झाले आहे?' तेव्हा मीरा अगदीच लहान म्हणजे पाच–सहा वर्षाची अबोध बालिका होती. आजीला तिच्या बालसुलभ प्रश्नाची गंमत वाटली. आणि तिने सांगितले की, 'अगं, तू रोज माझ्याबरोबर पूजा करतेस तोच, गिरीधर गोपाळ कृष्ण.'

या शब्दांमुळे मीरेच्या मनात कृष्णभक्तीची ज्योत जागवली गेली आणि तिने खरोखरच कृष्णाला आपला पती मानले. ती सतत कृष्णभक्तीत लीन राहू लागली. कृष्णभक्तीवर काव्ये करू लागली. तिचे पहिलेच कवन – स्तवन तिची कृष्णाबद्दलची समर्पण भावना सांगते.

**''मेरे तो गिरीधर गोपाल, दुसरा न कोई।''**

हीच तिची तीव्र भावना विवाहानंतरही कायम राहिली. तिचा विवाह मेवाड घराण्यातील महाराणा संग याचा जेष्ठ पुत्र भोजराज सिंह याच्याबरोबर झाला. भोजराज तेव्हा मेवाडचा युवराज म्हणून घोषित झालेला होता.

१५१६ साली भोजराजसिंह बरोबर लग्न होऊन मीराबाई मेवाड घराण्यात ज्येष्ठ सून, युवराज्ञी म्हणून प्रविष्ट झाली. पण तिने भोजराजला कधी आपला पती मानलेच नाही. तिच्या लेखी भोजराज म्हणजे तिचा सखा–मित्र होता. खूप जवळचा प्रेमाचा होता; परंतु पती नव्हता. तिचा पती फक्त कृष्ण होता.

मेवाडचे घराणे शिवभक्त होते. शूर वीरांचे होते त्यामुळे मांसाहार, मदिराप्राशन इ. गोष्टी त्या घराण्यात होत्याच. पशूंचा बळी देणे आणि तो देवीचा प्रसाद म्हणून ग्रहण करणे ही त्या घराण्याची रीत होती. ही प्रथा मीराबाईला पटली नाही. एखाद्या जीवाची हत्या करणे हे तिच्या मनाला भावले नाही. त्याला तिने विरोध केला आणि तो देखील लग्नानंतरच्या काही दिवसातच.

नवीन सुनेच्या हाताला लावलेल्या मेंदीचा रंग उतरला की तिने तिच्या सासरघरी चुलीची पूजा करायची आणि पहिल्यांदा काहीतरी गोडधोड शिजवायचे अशी प्रथा आजही उत्तरेत आहे. त्याला बहूभोज  असे नाव आहे. नवीन सुनेचे एक प्रकारचे हे कौतुक असा या प्रथेचा अर्थ घेता येईल.

परंतु याच दिवशी मीरा तिच्या सासरघरात नावडती झाली. नेहमीच्या प्रथेप्रमाणे राजगुरुंनी पशु–बळी दिला आणि ते मांस स्वयंपाक घरात शिजवण्यासाठी पाठवले होते. पण मांस शिजवायला मीरेने नकार दिला. त्यामुळे तिच्या सासरघरात सगळे नाराज झाले, उघड उघड तिला विरोध निर्माण झाला; तरी तिने त्याची पर्वा केली नाही. तिने केलेला इतर स्वयपांक उत्तमच झाला होता. पण त्या दिवशी तो सगळा वाया गेला. कुणीच जेवलं नाही. सगळ्यांच्या मनात मीरेबद्दल नाराजी भरून राहिली होती. त्यातच राजगुरुंच्या धर्मवर्चस्वाला विरोध झाल्यामुळे त्यांनीही खपू थयथयाट केला. तरीही मीरा बधली नाही. मीरा ही 'वक्षृवल्ली आम्हा सोयरी वनचरे' या मुशी घडलेली होती. त्यामुळे तिला अशा प्रकारे जाणून बुजून केलेली

पशूहत्या आणि त्याला दिलेला धार्मिक भक्तीचा मुलामा पटणे शक्यच नव्हते. खऱ्या भक्ताला नेहमीच निसर्गाच्या सर्व लेकरांच्या ठायी देवाचे रूप दिसते. अशा परिस्थितीत खरा भक्त दुसऱ्या जीवाला मारून खाण्याशी कसा सहमत होणार? मीरेचीही हीच विचारसरणी होती. पण धर्माचे कातडे ओढून बसलेल्या हेकट-हट्टी माणसांना हे कसे काय पटणार?

त्यामुळे मीरेच्या सासरी तिला विरोध सुरू झाला; आणि तो दिवसेंदिवस वाढतच गेला. पण तिचा पती भोजराज ह्याचा तिला पाठिंबा होता. त्याचे संरक्षण होते, तोपर्यंत सगळे ठीक चालले होते. खरंतर भोजराजाचे आणि तिचे पती-पत्नी सारखे संबंध निर्माणच झाले नसावेत. कारण भोजराजाला तिने कधी आपला पती मानलंच नाही. तरीही तो तिची भक्तिपूर्ण मनोभूमिका समजून घेत राहिला; कारण तिच्या मनातला प्रामाणिक भक्तीभाव त्याला समजला असावा, पटला असावा. शिवाय पूर्वीच्या राजांना एकापेक्षा जास्त पत्नी असतच, तशाच त्यालाही असाव्यात. पण तो मुळातच समजुतदार आणि ऋजू मनोवत्तीचा असावा. त्यामुळे तो जिवंत असेपर्यंत मीरा सर्व तऱ्हेने सुरक्षित होती.

पण तिच्या दुर्दैवाने लग्नानंतर दोन-तीन वर्षांतच मेवाडवर बाबराने आक्रमण केले आणि लढाईत भोजराज मारला गेला. मग मात्र मीरेला मिळणारे सर्व संरक्षण संपले. त्यातच तिने भोजराजाच्या मृत्यूनंतर आपली सौभाग्यचिन्हे उतरवली नाहीत; कारण तिच्या दृष्टीकोनातून ती सौभाग्यचिन्हे ही कृष्णाच्या नावाने तिने धारण केली होती.

तिचा धाकटा दीर विक्रमसिंह याच्या हातात सर्व सत्ता आली. त्याला मीरेची भक्तीभावना समजू शकली नाही. मग मीरेला उघड उघड विरोध सुरू झाला. त्यातच संत रैदासांसारख्या एका चांभार जातीतील संताला मीरेने गुरु म्हणून स्वीकारले. एकतर उच्चकुलीन घराण्यातील सून, त्यात विधवा आणि ती एका चांभाराला गुरु मानते, कोणत्याही जातीतल्या साधूंबरोबर वावरते, भजन करत हिंडते हे सर्व काही सिसोदिया वंशाच्या राजघराण्याला मान्य होणं शक्यच नव्हतं. शेवटी मेवाडच्या धर्मपरिषदेने मीरेचा वध करायचे ठरवले आणि त्यासाठी राणा विक्रमसिंहाने तिला विषाचा प्याला पाठवला. शिवाय एका टोपलीत अतिविषारी सापही तिच्याकडे पाठवला. परंतु 'ज्यांको राखे साईया, मारी सके ना कोय.' अशी ईश्वरकृपा झालेल्या मीरेला त्याचे काय? तिने स्वतःच म्हटलेआहे,

**विषका प्याला राणाजीने भेज्या, पिवत मीरा हांसी रे**
**मीरा भई अविनाशी रे**

कृष्णकृपेने विषाचा प्याला अमृतासारखा झाला आणि ते अमतृ पिऊन मीरा अविनाशी झाली, अमर झाली.

तिला त्यानंतर एकदा पाठवलेल्या विषारी नागाची फुलाची माळ झाली. तिच्यासाठी कुलुपबंद करून टाकलेल्या कृष्ण मंदिराच्या साखळ्या तटातट तुटल्या. त्यानंतर मात्र मीरेने घर सोडले आणि तिने

## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे सभासद संपर्क अभियान

आपले संघाचे जवळपास १०२० आजीव सभासद आहेत. सुमारे ५८ वर्षांपासूनचे सभासद नोंदणी अर्ज संस्थेकडे उपलब्ध आहेत. पण कालानुरूप बदल झाल्याने त्यात अनेक संदर्भ, माहिती आवश्यक आहे. जेणे करून संघाला पुढील २५ वर्षांचे नियोजन करणे शक्य होईल. तसेच अनेक सभासद नोंदणी अर्ज जीर्ण झाल्याने त्याचे संकलन अवघड झाले होते पण, आपले हितचिंतक, मार्गदर्शक **श्री. प्रसाद खाडिलकर** यांनी त्याची जबाबदारी घेऊन ते अमेरिकेला गेले असता सर्व अर्जातील माहिती अद्ययावत सॉफ्टवेअरमध्ये पूर्णपणे भरून संस्थेला सर्व सभासद यादी परिपूर्ण करून दिली आहे. **हे सॉफ्टवेअर श्री. प्रसाद खाडिलकर यांनी संस्थेला विनामोबदला तयार करून दिले आहे, त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघ त्यांचे सदैव ऋणी राहील.** ही सभासद यादी अद्ययावत करण्यासाठी आपण संघाचे कार्यालयात आपली माहिती आमचे प्रतिनिधींना देऊन सहकार्य करावे. नवी अद्यावत सभासद यादी तयार होण्यासाठी हे आपले सहकार्य अपेक्षित आहे.

**- अध्यक्ष**

तीर्थयात्रा केल्या. शेवटी ती द्वारकेला येऊन स्थिरावली. अनेक वर्षे द्वारकेत राहिल्यावर मग तिला प्रेरणा मिळाली, त्याप्रमाणे ती गुजरातमधील रणछोड मंदिरात पोचली आणि तिथेच ती कृष्णमूर्तीत विलीन झाली.

मीराबाई ही ललितेचा अवतार मानली जाते. (तीन क्रमांकाच्या लेखात मी या ललितेबद्दल लिहिलेच आहे.) बहुतके सर्व संतांनी आपल्याकडे विराण्या लिहिल्या आहेत. परमेश्वराला आपला पती, प्रियकर,सखा असे मनून, उद्देशून त्याच्या विरहात आपण तडफडत आहोत, व्याकुळ आहोत, असा भाव आपल्याला या विराण्यांतून आणि काही अभंगांतून दिसून येतो. ''हे परमेश्वरा, आता तरी माझी आठवण काढ, माझ्याकडे आतातरी सत्वर धावून ये, माझी तृषापूर्तता मिटव, माझे प्रेम स्वीकारण्यास आता विलंब लावू नकोस. धाव रे धाव श्रीहरी, माझी नैया या भवसागरातून पार कर. मला तुझ्याकडे घेऊन जा, मला तुझ्यात विलीन करून घे. आता उशीर करू नकोस. कृष्णा धाव बा लवकरी – संकट पडले भारी'' अशा प्रकारचा धावा, अशी साद सर्वच संतांनी भक्तीच्या कुठल्या न कुठल्या टप्प्यावर परमेश्वराला घातलेली आपल्याला संत साहित्यात दिसून येते.

ही अशी साद मानसिक असे आणि संत साहित्यातून प्रकट होत असे. परंतु मीराबाईने ही मानसिक हद्द पार केली. तिच्या एका कवनामध्ये तिने कृष्णाला विनंती केली आहे,

**''मने चाकर राखो जी''**

कदाचित हे कवण लिहीत असताना तिला तिच्या पर्वूजन्मीची, ललितारूपाची आठवण आली असावी. तेव्हाही ती कृष्णाची सेविकाच होती ना ! तव्हो ती म्हणते,

**''मीराको प्रभु सांची दासी बनावो''**

तिनेसुद्धा विराणीचा भाव व्यक्त केलेलाच आहे–

**''प्यारे मने दरसन दिज्यो आय,**
**तुम बिन रहियो ना जाय''**

किंवा,

**''गली तो चारो बंद हुई, मै हरिसे मिलू कैसे जाय''**

पुढेतर तिने कृष्णाजवळ तक्रारही केली आहे,

**''तुम्हरे कारण सब छोड्या,**
**अब मोही क्यूँ तरसावौ हौ ?''**

पुढे तर तिला साक्षात्कार झाला –

**''मै तो प्रेम दीवानी, मेरा दर्द ना जाने कोय !''**

म्हणून ती म्हणते,

**''चालो मन गंगा जमुना तीर''**

पुढे ती कृष्णावर अधिकारही गाजवते,

**''जो तुम तोडो पिया , मै नाही तोडू रे,**
**तमु संग तोडी कृष्णा कोण संग जोडू रे''**

इतकी अवस्था आली तेव्हा तिला कृष्णाच्या मुरलीचे पूर्वजन्मी ऐकलेले स्वर्गीय स्वर ऐकू येऊ लागले,

**''फिर बाजे बरनै हरी की मुरलीया सुनौ रे''**

आणि मग तिला राधेचीही आठवण येऊ लागली –

**''राधे देवो बाँसुरी मोरी''**

अशा तऱ्हेचे लटके भांडण ती राधेबरोबर करू लागली.

शेवटी द्वारकेच्या कृष्ण मंदिरात भजन करता करता तिला असेही म्हणावेसे वाटले –

**''कोई कहियो रे प्रभु आवनकी,**
**आवनकी मन भावनकी**
**मीरा कहे प्रभु कब रे मिलोगे**
**चेरी मै हुं तेरे दावनकी''**

असे कवण करता करता, गाता गाताच ती गाभाऱ्यातील कृष्णमूर्तीच्या अगदी जवळ गेली, आणि पाहता पाहता सर्व भक्तजनांच्या डोळ्यांदेखतच त्या कृष्णमूर्तीत विलीन झाली ! खरोखरच –

**''मीरा भई अविनाशी रे''**

मीराबाईचा म्हणूनच ''कृष्णसख्यां''मध्ये समावेश केला पाहिजे.

**– सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,**
मोबा. ९९२००५८७०५

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमशः वाचित आहोत.

## अध्याय ३ : कर्मयोग

**हा कोण प्रेरिला प्राणी । पाप आचरतो दाटुनी ।**
**इच्छिलिया वांचुनी । बळत्कारें कोण करितसे ।।३६।।**
मनुष्य करितो पाप कोणाच्या प्रेरणेमुळें ।
आपुली नसतां इच्छा वेठीस धरिला ज़सा ।।३६।।

**श्रीभगवानुवाच ।**
**देव म्हणती गा पार्थ । हे काम क्रोध वैरी जाण निभ्रांत ।**
**रजोगुणापासूनी होत । पाप जाण ।।३७।।**
काम हा आणि हा क्रोध घडिला ज़ो रजोगुणें ।
मोठा खादाड पापिष्ठ तो वैरी ज़ाण तूं इथें ।।३७।।

**अग्नि झाकोंळला धुम्रबळें । दर्पण जैसे का गळे ।**
**गर्भ वेष्टिला जारें सकळें ।**
**तैसा आत्मा अज्ञाने करूनी ।।३८।।**
धुरानें झांकिला अग्नि धुळीनें आरसा ज़सा ।
वारेनें वेष्टिला गर्भ कामानें ज्ञान हें तसें ।।३८।।

**तैसें ज्या कळले तेणे ।**
**म्हणुनी ज्ञानियाचा नित्य वैर म्हणे ।**
**म्हणोनि कामरूप कर्म दहणें ।**
**दुरी करूनी त्यजावीं ।।३९।।**
काम-रूप महा-अग्नि नव्हे तृप्त कधीं चि ज़ो ।
ज़ाणत्याचा सदा वैरी त्यानें हें ज्ञान झांकिलें ।।३९।।

**इंद्रिय आणि मन बुद्धि । यांसी काम अधिष्ठान आधीं ।**
**यांते भुलवुनी त्रिशुद्धी । ज्ञान लोपितसें ।।४०।।**
घेऊनि आसऱ्यासाठीं इंद्रियें मन बुद्धि तो ।
मोह पाडी मनुष्यातें त्याच्या ज्ञानास गुंडुनी ।।४०।।

**या कारणें या आणी मना । तूं नेमी गा अर्जुना ।**
**सांडी पाप कर्म जाळून ।**
**ज्ञानें विज्ञान नासितसे ।।४१।।**
म्हणूनि पहिला थारा इंद्रियें तीं चि जिंकुनी ।
टाळीं पाप्यास ज़ो नाशी ज्ञान विज्ञान सर्व हि ।।४१।।

**इंद्रियाहुनी बोलिजे मन ।**
**मनाहुनि बुद्धि अधिक जाण ।**
**बुद्धीहुनी अंतःकरण । सर्वात श्रेष्ठ ।।४२।।**
इंद्रियें बोलिलीं थोर मन त्यांहूनि थोर तें ।
बुद्धि थोर मनाहूनि थोर तीहूनि तो प्रभु ।।४२।।

**ऐसें जाणोनि घे अंतःकरण ।**
**तैसे आत्मेनी परमात्म तत्त्वज्ञान ।**
**वीतरागी जाळून । काम दुरी करी ।।४३।।**
असा तो प्रभु ज़ाणूनि आवरीं आप आपणा ।
संहारीं काम हा वैरी तूं गांठूनि परोपरी ।।४३।।

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगो
नाम तृतीयोऽध्यायः ।।३।।
श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

# झाशीची राणी लक्ष्मीबाई

## भाग २

**झाशी संस्थान खालसा :** ईस्ट इंडिया कंपनीद्वारे ब्रिटिश सरकार झाशी संस्थान खालसा करणार नाही असे पूर्वीपासून झाशीच्या ब्रिटिशांशी असणाऱ्या मैत्रीपूर्ण संबंधांवरून राणी लक्ष्मीबाईंना वाटत होते. त्यासाठी लक्ष्मीबाई स्वतः ईस्ट इंडिया कंपनीशी पत्रव्यवहार करत होत्या. या पत्रव्यवहारातून त्यांनी कंपनी सरकारचा अन्याय, बेकायदेशीरपणा आणि खोडसाळपणा उघड केला. एका पत्रात त्यांनी, झाशी संस्थान खालसा केले तर पूर्ण हिंदुस्थानातील लोकांना हळहळ वाटेल. परिणामी हिंदुस्थानातील लोकांना ब्रिटिशांबद्दल भरवसा, विश्वास वाटेल का? अशी शंका व्यक्त करून कंपनीला एक प्रकारचे आव्हान दिले. कंपनी सरकारच्या बेजबाबदार अनैतिक कृत्यांना व कंपनीच्या अधिकाराला आव्हान देण्याचे धारिष्ट्य करणाऱ्या राणी लक्ष्मीबाई या देशातील पहिल्या काही व्यक्तींमधील एक होत्या.

परंतु हिंदुस्थानातील संस्थाने खालसा करण्याचा निर्णय गव्हर्नर जनरल डलहौसीने घेतलेलाच असल्याने झाशी संस्थानही खालसा करण्यात आले. १३ मार्च, इ.स. १८५४ रोजी झाशीच्या जनतेला उद्देशून जाहीरनामा काढण्यात आला. त्यानुसार दत्तक विधान नामंजूर करून झांशी संस्थान ब्रिटिश सरकारांत विलीन करण्यात आले. त्या वेळीच स्वाभिमानी राणीने 'मी माझी झाशी देणार नाही !' असे स्फूर्तिदायक उद्गार काढले.

झाशी खालसा झाल्यावर राणी लक्ष्मीबाईंना किल्ला सोडून शहरातील राजवाड्यात राहायला यावे लागले. राणी लक्ष्मीबाईंना पदच्युत झाल्याचा अपमान सहन करीत काही काळ शांत बसावे लागले होते.

**झाशीचा किल्ला : इ.स. १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध व हुतात्मा :** इ.स. १८५७ चा उठाव हा संपूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याप्रमाणे ५ जून, १८५७ ला झाशीतही शिपायांचा उद्रेक झाला. केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून लावले. या परिस्थितीत इंग्रजांच्या परवानगीची वाट न पाहता राणी लक्ष्मीबाई किल्ल्यावर राहण्यास गेल्या. पुढे २२ जुलै, इ.स. १८५७ ला ब्रिटिशांनी राणींना झाशीची अधिकारसूत्रे हाती घेण्यास सांगितले. राणी पुन्हा राज्यकर्त्या झाल्या होत्या, परंतु अतिशय बिकट परिस्थितीत त्यांच्या हाती राज्यकारभार आला होता. मनुष्यबळ नव्हते आणि खजिनाही रिकामाच होता. प्रजेच्या मनात असुरक्षित भविष्याबद्दल भीती होती. परंतु तरीही लक्ष्मीबाईंनी खंबीरपणाने परिस्थिती हाताळली. जुन्या विश्वासातील लोकांना परत बोलावून त्यांना काही अधिकाराची पदे दिली. दिवाण लक्ष्मणरावांना प्रधानमंत्री, तर प्रत्यक्ष वडिलांना – मारोपंत तांब्यांना – खजिनदार केले. लक्ष्मणरावांचा भाऊ, मुलगा तसेच मुन्सफ, भोलानाथ, आणि नामांकित गोलंदाज खुदाबक्ष यांना फौजेचे व शस्त्रास्त्रांच्या जोडणीचे काम दिले. बंडखोर ठाकुरांना धोरणीपणाने आपल्या बाजूस वळविले; राज्याच्या सल्लागार मंडळात सामील करून घेतले. ब्रिटिशांनी निकामी केलेल्या २२ तोफा पुन्हा सुरू करून तोफगोळ्यांची निर्मितीही सुरू केली. इंग्रजांविरुद्ध बंड करणाऱ्या विद्रोही शिपायांना आपल्या सैन्यात सामील करून घेतले. परकीयांविरुद्ध लढण्याची तयारी करीत असतानाच राणींनी प्रजेचा स्वाभिमान, निष्ठा वाढवण्याचा व आनंद जपण्याचा प्रयत्न केला. दानशूर, श्रद्धाळू व दयाळू लक्ष्मीबाईंनी थंडीत कुडकुडणाऱ्या हजार–दीड हजार गरिबांना, साधू–संन्याशांना उबदार कपड्यांचे वाटप केले. स्वतःबरोबर प्रजेच्या श्रद्धा जपणाऱ्या राणीने गोवध बंदी केली. त्यांनी किल्ल्यावर रंगपंचमीसारखा सण साजरा करून स्त्रियांसाठी हळदी–कुंकवाचे कार्यक्रम केले.

अशा प्रकारे प्रशासन, सैन्य व कल्याणकारी कामे यांची चोख व्यवस्था लावून स्वराज्य असल्याचा विश्वास राणी लक्ष्मीबाईंनी जनतेत निर्माण केला. प्रजेला मुक्त मनाने आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यासाठी, त्यांच्या कलेची जोपासना करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी झाशीमध्ये मराठी नाटकांचे प्रयोग घडवून आणले. मराठी भाषिकांसाठी रासक्रीडा,

**(पुढील मजकूर पान ११ वर पाहा...)**

# म्हणींचे म्हणणे

## अवशी खाई तूप आणि सकाळी पाही रूप

ए आई, ए आई ! चटकन इकडे ये. हे बघ माझी चार चित्रे पूर्ण झाली काढून. उद्या सरांना मी खूष करून टाकतो की नी बघ, एकदम सगळ्यात पहिलं मीच पूर्ण केलं असेल. मला असंच वाटतय!! नकुल श्वेताला हाक मारून हे सांगत होता. श्वेता गडबडीने बाहेर आली.आपल्या मुलाची सारी चित्रं पाहिली अन् तीला एकदम आनंद झाला. ती त्याच्या बोलण्याला दुजोरा देत म्हणाली, हो रे, खूप खूपच सुंदर! उद्या मीही येईन शाळेत तुझ्याबरोबर, सरांची प्रतिक्रिया मलाही बघायची आहे.

दुसऱ्या दिवशी श्वेता आणि नकुल सगळं आवरून शाळेत गेली. कधी एकदा चित्रकलेचे सर येतात अन आम्ही त्यांना भेटतो असे त्यांना झाले होते. चित्रकलेचे सर आले. वर्गात सगळ्यांची चित्रं बघून झाली. नकुलने देखील आपले चित्र दाखवले. सरांनी शांतपणे त्याच्या चित्रातील अनेक चुका दाखवल्या. बारकावे समजून सांगितले. अजून दहा बारा वेळा तेच चित्र काढ. बारकाईने निरीक्षण कर. रंगसंगती बघ. मुळात आपल्या मनातले भाव त्या चित्रातून बोलू देत असं सांगितले, अन् त्या चित्राबरोबर चित्रकला या कलेच्या इतिहासाबद्दल माहिती दिली. मोठ्या मोठ्या चित्रकारांची नाव सांगितली. त्यांच्या चित्रशैलीबद्दल भरभरून बोलले. सरांनी नकुलला उत्तम चित्रकार होण्यासाठी आवश्यक ते ज्ञान दिले. श्वेता आणि नकुल दोघही हिरमुसली झाली. कारण त्यांना अपेक्षित होते तसे काहीच घडले नाही.

आज शहर पातळीवर डान्सची स्पर्धा होती. छोटी नंदिता आरशासमोर उभी राहून थिरकायची, कंबर हलवायची म्हणून हौसेने क्षितीजाने तिला डान्स क्लासला घातले. तीन वर्षाची नंदिता कधी कंटाळून, कधी रडून, कधी उत्साहात क्लासला जात होती. तिच्यासाठी क्षितीजा तास भर त्या क्लासच्या बाहेर वेळ घालवायची. जेमतेम चार महिने झाले असतील नृत्य शिकवणीला. अन् ही स्पर्धा जाहीर झाली. क्षितीजाने लगेच शिक्षिकेला सांगून स्पर्धेत नाव दिले. अंगभूत नृत्याचे गूण नंदितामधे होते. शिक्षिका तिला तशी तयारही करत होती. आज पहिला राउंड होता. वेगवेगळ्या वयोगटातील १५० मुलं मुली यासाठी आलेली होती.नंदिताचा नंबर ७८ वा होता. दुपार टळून गेली होती. कंटाळलेली, हिरमुसलेली नंदिता आपल्या नंबरची वाट बघत होती. अखेर तिचा नंबर आला. उसन्या उत्साहाने किंवा तिला उत्साही बनवत क्षितीजाने नंदिताला स्टेजवर पाठवलं. गाणं लावल्या नंतर परिक्षकांच्या समोर नंदिताला डान्स करणं जमलं नाही. क्षितीजाने तिला ब्रेक घेऊन चिअरअप केलं, दोन शब्द रागाचेही ऐकवले. पण नंदिता मनापासून ते करू शकली नाही. परिक्षकांनी तिचं वय बघता क्षितीजाला पुढील स्पर्धेसाठी तयारी करा असं सांगून निरोप दिला. क्षितीजा परिक्षकांवर मनातल्या मनात चीडून तिथून बाहेर पडली.

आजकालच्या फास्ट दैनंदिन जीवनात हे असे प्रसंग आपण अनेकदा अनुभवतो. फटाफट रिझल्ट किंवा अपेक्षित परिणाम मागण्याची मनोवृत्ती बळावली आहे हेच यातून दिसून येतं. यालाच जुनी लोकं म्हणतात, 'अवशी खाई तूप आणि सकाळी पाही रूप!'

जगण्यातला संयमीपणा, वाट बघणं, पेशन्स हरवत चाललाय हे नक्की. अर्थात प्रत्येकवेळी असं नसतं हे जरी मान्य केलं, तरी खूपदा हे असच चित्र अनेक बाबतीत पहायला मिळतं. टिव्हीवर लागणाऱ्या जाहिराती हे याचं उत्तम उदाहरण आहेत. कुठलीही सौदर्य प्रसाधनाची जाहिरात पहा, तीन दिवसात उजळपणा, केसांच्या वाढीसाठी वापरावयाचे तेल, उंची वाढण्यासाठी घ्यावयाची पेय अन् साबणांबाबत तर बोलायलाच नको. निसर्गाने दिलेलं रूप चिरकाल टिकते ते बाह्य रूपाला लावलेल्या साबणाने. अशा अनेक जाहिराती आपण अंधपणाने पाहतो. कुठल्याही उत्पादनकर्त्या कंपनीला वास्तवाची फिकिर करायला वेळच नसतो. कारण त्यांना लोकांची मानसिकता ठाऊक आहे. अवशी खाई तूप, सकाळी पाही रूप..!!

पूर्वीच्या काळी कुठलीही कला आत्मसात करण्यासाठी अनेक वर्ष सराव, साधना केल्याशिवाय आपण कलाकार आहोत हे लोक स्वतःच मान्य करत

नव्हते. आजही अनेक कसलेले, निष्णात, पट्टीचे कलाकार आपण विद्यार्थी आहोत असच नम्रपणे मानून रहातात आणि दुसरीकडे या सगळ्याच्या विरुद्ध मनोवृत्ती दिसून येते. अगदी कलावंत जन्माला येतो असं मानलं तरी त्याला पैलू पाडायला गुरुही लागतो आणि वेळही तेवढाच जातो, जायला हवा.जितका सराव जास्त, साधना जास्त तेवढे कसब पणाला लागते. कलावंत पक्का घडतो. अर्थात हे फक्त कलेच्या बाबतीत नाही तर आयुष्यातल्या प्रत्येक गोष्टीत अनुभवायला मिळतेच.

यशस्वी होण्यासाठी या साऱ्या गोष्टी काळानुसार संथगतीने पण सहनशील वृत्तीने कराव्या लागतात. जुनी लोकं यानेच मोठी झाली म्हणून अशा म्हणी सतत आठवत रहातात. कारण एका रात्रीत कुठलाच बदल होत नाही. त्यासाठी अवधी द्यावाच लागतो. वेळ जावाच लागतो. नाहीतर मग ती गोष्ट देखील क्षणभंगुर ठरते. अपवाद असतीलही काही, कारण नियम तेव्हाच स्पष्ट होतात. पण तरीही जनरीत हेच म्हणते. 'अवशी खाई तूप आणि सकाळी पाही रूप' असं कधीच वागू नये.

– **वैदेही जोशी,** मोबा. ९५४५६३५४६५


**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**
**गोखले ब्रदर्स**
**सराफी दुकान**
**बुधवार, दि. 19 : पुष्य नक्षत्र**
**आपलं दुकान**
**महाद्वार रोडवर,**
**0231–2546585**


## महाराणी लक्ष्मीबाई

**(पान नं. ९ वरून पुढे...)**

चित्रलेखा, बाणासूर इ. नाटके योजली. स्वतःही नाटकांचा आनंद घेतला. एक स्थिर, सुरक्षित, समृद्ध व सुसंस्कृत राज्य घडवण्याचा प्रयत्न राणी लक्ष्मीबाईंनी केला. यामुळे राणी आणि झाशीतील प्रजा यांच्यातील नाते दृढ झाले.

दरम्यान २१ मार्च, इ.स. १८५८ ला सकाळीच सर ह्यू रोज आपल्या फौजेसह झाशीजवळ आला. त्याने राणीस निःशस्त्र भेटीस यावे किंवा युद्धास तयार राहावे असे कळविले. ब्रिटिशांनी केलेल्या विश्वासघातामुळे, अन्यायामुळे 'भारतात विदेशी शासन नकोच' अशा ठाम मताच्या राणींनी भेटीस जाण्याचे नाकारले. त्याच वेळी तात्या टोपे यांच्याशी संधान बांधून एका बाजूने इंग्रजांवर हल्ला करण्यास सुचविले.

उत्तम प्रतीचा सेनानी आणि कर्तबगार राजकारणी असणाऱ्याया ह्यू रोजने झाशीच्या किल्ल्यावर मारा करण्यासाठी आजुबाजूच्या टेकड्यांवर कब्जा मिळविला. त्या टेकड्यांवर तोफा चढवल्या. २-३ दिवस झाशीची बाजू अभेद्य होती. घनगर्ज,नालदार,भवानीशंकर,कडक बिजली या तोफा आपल्या नावाप्रमाणे कार्यरत होत्या. गौसखान याने तर तोफेमधून असा मारा केला, की त्यामुळे दोन शिवमंदिरे वाचली. या गोष्टीसाठी आजही झाशीतील लोक त्याला धन्यवाद देतात. युद्धाच्या ९ व्या दिवशी इंग्रजांनी पश्चिमेकडील तोफ बंद पाडून त्या बाजूच्या तटाला खिंडारे पाडली. ही खिंडारे बुजवण्यासाठी रातोरात काम केले गेले. त्या वेळी चुना, दगड, विटा यांची ने-आण करण्याचे काम स्त्रियांनी केले होते हे विशेष !

# मुलांचे पान




## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

**(लेखांक पंचविसावा)**

कावेरीअक्काचं बोलणं ऐकून निवृत्तीला हुंदका फुटला, तर बाकी तिघं कावरीबावरी झाली. विनायकबुवांनी निवृत्तीचा हात धरला आणि हाताला धरून ते त्याला पुढे आणणार, तोच, ''थांब दादा, थांबा विनायकबुवा, मी बोलतो. मी सांगतो आई-बाबांना काय सांगायचंय ते ! मीच सांगतो,'' असं म्हणत ज्ञानेश्वर पुढे झाला. त्याच्या त्या स्वराचं निवृत्तीला नवल वाटलं. दृढनिश्चय, ठामपणा, जबाबदारीची जाणीव, संपूर्ण आश्वासकता आणि बाणेदारपणा त्याच्या स्वरात होता. ''ज्ञानाऽऽ !! ज्ञानेशाऽऽ !!'' निवृत्तीच्या आवाजात कंप होता. ''होय दादा. मी - मीच - मीच देतो त्यांना वचन! मीच देतो !'' ज्ञानेशाच्या आवाजात तोच ठामपणा होता. तोच दृढनिश्चय होता. निवृत्तीला तिथेच थांबवून ज्ञानेश्वर पुढे झाला.

हे काय चाललंय, जे काही चाललंय त्याचा अर्थ सोपानाला कळत नव्हता; पण ज्ञानेश्वरानं निवृत्तीला थांबवलं आणि आई-बाबांना कसलंतरी वचन देण्यासाठी तो पुढे झाला आहे, हे बघून त्याच्याही नकळत सोपान पुढे झाला आणि ज्ञानेश्वराच्या शेजारी जाऊन उभा राहिला. ज्ञानेश्वरानं त्याच्याकडे नजर टाकली. सोपानाला आपल्यासोबत पाहून त्याच्या नजरेत समाधानाची छटा उमटली; पण ज्ञानेश्वराची ती नजर सोपानाच्या अंगावर शहारा उठवून गेली. काय नव्हतं त्या नजरेत? एकाच वेळी त्या नजरेत सहस्त्र सूर्यांचं तेज होतं आणि त्याचबरोबर त्या नजरेच्या कटाक्षात सहस्त्र चंद्रांची शीतलता होती ! एकाच वेळी त्या नजरेत बंडखोरीची छटा होती आणि त्याचबरोबर पराकोटीची विनम्रता होती. एकाच वेळी ती नजर काहीशी बावरलेली होती ! आणि त्याच वेळी त्या नजरेत अपार निश्चय होता ! ज्ञानेश्वरानं हात जोडले. गंगेच्या घाटावर जमलेल्या सगळ्या लोकांकडे एकदा नजर टाकली आणि पुन्हा त्याची नजर त्या वेदीकडे वळली. क्षणभरात एकाग्र चित्त होऊन त्यानं आपल्या डोळ्यांत अवघी ऊर्जा एकवटली आणि त्याला दिसली तिथं लहरणारी दोन विरळ शरीरं ! एक स्त्रीचं आणि एक पुरुषाचं ! होय, ते त्यांचे आई-बाबाच होते. क्षणभर ज्ञानेशाच्या डोळ्यांत पाणी तरळलं; पण दुसऱ्या क्षणाला त्याच्या उच्छ्वासातून त्याच्या मनाचा निग्रह स्पष्ट झाला आणि डोळे मिटून ज्ञानेश्वरानं खणखणीत उच्चरवात बोलायला सुरवात केली.

आपला उजवा हात त्यानं ताठ पुढे करून पालथा धरला होता. सोपानानं आपला हात त्याच्या हातावर ठेवला. ते बघून कावेरीअक्कांचा हात सोडून मुक्ता पुढे झाली. आणि तिच्या उंचीमुळे मग तिनं ज्ञानेश्वराच्या हाताखाली आपला हात लावला. भावंडांचे हात मिळताच ज्ञानेश्वरानं बोलायला सुरुवात केली, ''आई-बाबा, आम्ही चारही भावंडं आज या गंगेच्या साक्षीनं तुम्हाला एक वचन देतो आहोत. धर्मशास्त्राचे न्याय्य अर्थ लावून सामान्यांपर्यंत धर्म पोहोचवण्याची तुमची संकल्पना आम्ही साकार करू. ज्या धर्मसभेनं तुम्हाला देहान्त प्रायश्चित्त घ्यायला लावलं, त्याच धर्मसभेत तुमचा सन्मानानं उल्लेख होईल, असं अलौकिक कार्य आम्ही करून दाखवू. ज्या शुद्धिपत्रासाठी तुम्ही दोघांनी आत्मसमर्पण केलं, ते शुद्धिपत्र हीच धर्मसभा आम्हाला आपणहून बहाल करेल. तुमच्या मातृ-पितृत्वाचा आणि आमचा जयघोष करेल. आई-बाबा, आजपासून आम्ही चौघंही जण एकोप्यानं, एकदिलानं राहू आणि आम्ही तिघंही जण मुक्तीचा काळजीपूर्वक सांभाळ करू. तुम्हा दोघांची मोक्षाप्रती वाटचाल सुखेनैव होऊ दे. तुम्ही दोघंही आमच्या स्मृतीत चिरंतन राहाल. आमच्या कार्य-कर्तृत्वानं आपल्या कीर्तीची ध्वजा शतकानुशतकं फडकत

राहील, अशी ग्वाही तुम्हाला देतो. यासाठी तुमचे आशीर्वाद सदैव आमच्यासोबत असू देत, अशी प्रार्थना करतो. हा अर्धा-मुर्धा नैवेद्य तुमच्यासाठी. आई-बाबा शुभास्ते पंथान:।।''

ज्ञानेश्वराच्या प्रत्येक वाक्याला सोपान हुंदका देत होता. आपली सहमती दर्शवत होता. निवृत्तीच्या स्पर्शातून त्याची संमती कळत होती. बोलता-बोलता ज्ञानेश्वरानं डोळे मिटले. सोपान त्याच्याजवळ उभा होता. अगदी जवळ. त्यानं पाहिलं ज्ञानेश्वराच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहत होते. तरीही त्याच्या चेहऱ्यावरचं तेज यत्किंचितही कमी झालं नव्हतं. ज्ञानेश्वराकडे क्षणभर नजर टाकून सोपानानं वेदीकडे पाहिलं आणि दोन विरल आकृत्या आणखी-आणखी विरल होताना त्याला दिसल्या.

'कावकाव'च्या आवाजानं सगळे भानावर आले. पश्चिमेकडच्या पिंडाला काकस्पर्श झाला होता. बाकीच्या पिंडावर आणखीही कावळे घोंगावत होते; पिंडाचा भात खाण्यासाठी त्यांची नुसती अहमिका लागली होती. त्यांच्या पंखांच्या फडफडाटानं वादळाचा भास निर्माण होत होता. पण याहीपेक्षा मोठं वादळ उठवलं होतं, ज्ञानेश्वराच्या शब्दानं. त्यानं सर्वांच्या साक्षीनं आई-बाबांना दिलेलं वचन ऐकून अवघ्या सृष्टीला आनंदाचं भरतं आलं होतं. इंद्रायणीचं पाणी आनंदानं उसळू लागलं होतं. जणू ते आकाशाला गवसणी घालू पाहत होतं. ज्ञानेश्वराच्या वचनासारखं, सोपानाच्या हुंकारासारखं. त्या आनंदाची मोहिनी आकाशावरही पडली आणि आकाशाचे भालदार-चोपदार आकाशभर बागडू लागले. त्यांनी हा आनंद पाखरांना दिला. त्या आनंदाचं अक्षय सामर्थ्य पंखांत घेऊन ती पाखरं आकाशात विहार करू लागली. त्यांचा आनंद बघून वाराही आनंदला. तो आनंदाचा गंध घेऊन साऱ्या सृष्टीभर फिरला आणि अवघी सृष्टी आनंदून गेली. जणू या चौघांनी आई-बाबांना दिलेलं वचन पूर्ण करण्यासाठी सगळी पंचमहाभूतं त्यांच्या अवघ्या सामर्थ्यानिशी पाठीशी उभी राहणार होती. नव्हे, या चौघांचं हे वचन पूर्ण करण्याची जबाबदारीच जणू पंचमहाभूतांनी घेतली होती. जणू ज्ञानेश्वराचे शब्द अजूनही अवकाशात प्रतिध्वनित होत होते. जसे ते अवकाशात प्रतिध्वनित झाले, तसेच ते तिथं जमलेल्या लोकांच्या मनांतही प्रतिध्वनित झाले. त्या शब्दांमध्ये असं सामर्थ्य होतं की, या कुटुंबाची छी:-थू करणाऱ्यांच्या मनाचा थरकाप झाला. ही चार भावंडं म्हणजं चार दिव्य शक्ती आहेत, याची झलक या प्रसंगातून लोकांना पाहायला मिळाली.

काकस्पर्श झाला. उरलेले पिंड आणि इतर सामग्री गोळा करून निवृत्तीनं ती आपल्या उत्तरीयात घेतली आणि ती घेऊन तो नदीच्या पात्रात शिरला. गुडघाभर पाण्यात उभा राहून त्यानं ते पिंड पात्रात सोडले. दक्षिण दिशेला तोंड करून तो उभा राहिला. हात जोडले आणि प्रार्थना केली, ''न मे अस्ति वित्तं धनं न चान्यत् श्राद्धोपयोगी स्वपितृन् न तोऽस्मि ! तृष्यंतु भक्त्या पितरो मयैते भुजौ कृतौ वर्त्मनि मारुतस्य'' आणि आपले दोन्ही बाहू वर केले. नंतर नमस्कार करून त्यानं ओंजळीत पाणी घेऊन अर्घ्य दिलं आणि तो पात्रातून बाहेर आला.

श्राद्ध विधी झाला होता. आता ब्राह्मण भोजन व ब्राह्मण पूजा विधी होता. ब्राह्मणांच्या रूपात आपले तीर्थरूप बघून, कल्पून त्यांना हविर्भागातील एक घास, म्हणून भोजन देऊन तृप्त करायचे असा विधी; पण इथं कुणी ब्राह्मण आलेलेच नव्हते. विनायकबुवा पेचात पडले. निवृत्तीला म्हणाले, ''निवृत्ती, कुणी ब्राह्मण आलेले नाहीत. पितरांना हविर्भाग कसा मिळणार?'' त्यांचा प्रश्न रास्त होता. निवृत्तीला उत्तर सुचले नाही, पण त्यांना उत्तर दिलं सोपानानं. म्हणाला, ''काळजी नसावी विनायककाका. ब्राह्मण जेवणार, ते आई-बाबांचं प्रतीकात्मक रूप म्हणूनच. मग प्रत्यक्ष आई-बाबाच येतील आपला हविर्भाग घ्यायला. त्यांनी मला मघाशी तसा शब्द दिला आहे. मी आता जातो आणि आई-बाबांना बोलावून आणतो. आलोच मी कावेरीअक्का. तुम्ही अन्न वाढून ठेवा,'' असं म्हणून कुणी काही विचारायच्या आत सोपान गंगेकडे धावला. पाऊलभर पाण्यात जाऊन उभा राहिला. सोपानाच्या या बोलण्याचं निवृत्ती-ज्ञानेशाला नवल वाटलं, तर कावेरीअक्कांना वाटलं, तो लहान आहे,

म्हणून असं बडबडतोय. त्या विनायकबुवांना काहीतरी म्हणणार, तोच सोपानाचा आवाज ऐकायला आला. पाऊलभर पाण्यात उभे राहून गंगेकडे तोंड करून तो हाका मारत होता, ''आईऽऽऽ आऽऽई ! बाबाऽऽऽ! बाऽऽऽबा ! जेवायला चलाऽऽऽ! तुम्ही मघाशी मला शब्द दिला आहे. या लवकरऽऽऽ ! हा एवढा हविर्भाग घेऊन मगच मोक्षाप्रत जाऽऽ ! आऽऽऽईऽऽ, बाऽऽऽ बा ऽऽ !'' हळूहळू त्याच्या आवाजात आर्तता आली. स्वरात कंप जाणवायला लागला. गळा भरून आला. श्वासात हुंदका कोंडायला लागला. बऱ्याच हाका मारून झाल्यावर मात्र सोपान हातात तोंड झाकून हुंदके द्यायला लागला. कुणालाच कळेना काय करावं, काय बोलावं? सगळीकडे स्तब्धता पसरली. त्या स्तब्धतेत व्याकूळता होती, खिन्नता होती, दु:ख तर होतेच; पण वेदनाही होती. विरह होता आणि व्यथाही होती. क्षणभर; पण त्या एका क्षणात अवघं अवकाश नि:स्तब्ध झालं, अवघे चराचर अबोल झाले, अवघी सृष्टी मूक झाली. दुसऱ्या क्षणाला, दुसऱ्याच क्षणाला, इंद्रायणीचं पाणी खळबळलं. खळबळत वेगानं उसळलं, तिच्या पृष्ठभागावरच्या तरंगांत लक्षणीय वाढ झाली. त्या तरंगांच्या उंच लाटा बनल्या, ते उसळणारं पाणी काहीतरी सांगतंय, काहीतरी देऊ पाहतंय, अंतर्मनात दडलेलं, जलगर्भात लपलेलं काहीतरी बाहेर येऊ पाहतंय, स्वत:चं अस्तित्व दाखवू पाहतंय, असं वाटायला लागलं. पाण्याच्या लाटांचं उसळणं वाढलं, खळबळ वाढली, आवाज वाढला. सोपानानं हातात लपवलेला चेहरा उचलून नदीच्या पात्राकडे पाहिलं. त्याचा हुंदका थांबला. चेहऱ्यावर स्मित उमटलं. डोळ्यांत समाधानाची छटा आली; पण इंद्रायणीतली ती खळबळ बघून जमलेल्या लोकांच्या मनात धास्ती निर्माण झाली. आता हे पाणी प्रलयंकारी रूप धारण करतं की काय, अशी भीती त्यांना वाटायला लागली. त्यांच्यात चलबिचल सुरू झाली; पण सोपान शांत होता. नदीचं खळबळणारं पाणी बघून तो शांत झाला होता. एकवार त्यानं त्या उसळणाऱ्या पाण्याकडे नजर टाकली. अत्यंत समाधानानं दोन्ही हात जोडून त्यानं नमस्कार केला आणि नदीकडे पाठ करून शांतपणे तो श्राद्ध विधी स्थळाकडे चालत आला. निवृत्ती-ज्ञानेश्वरही ते उसळणारं पाणी बघून क्षणभर स्तिमित झाले; पण क्षणभरच. दुसऱ्याच क्षणाला दोघांच्या चेहऱ्यांवर स्मित उमटलं. सोपानाकडे नजर जाताच तर ते आणखीच शांत झाले. सोपानाच्या डोळ्यांतून पाणी वाहत होतं, तर चेहऱ्यावरून समाधान. (क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००

## शब्द

**शब्दांचा श्रीगणेशा,**
**शब्दांची बाराखडी,**
**शब्दांचे पारायण, विद्याधन ।।**

**शब्दांची आरती, शब्दांचा भांडार,**
**शब्दांनी सुकर, भक्तिमार्ग ।।**

**शब्दांची स्तोत्रे, शब्दांचे मंत्र,**
**शब्दाविना कठीण, कर्मकांड ।।**

**शब्दांचे शस्त्र, शब्दांचे शास्त्र,**
**शब्द हे साधन, विद्वानांचे ।।**

**शब्दांचे वार, शब्दांचे प्रहार,**
**शब्दांपुढे शब्द, नि:शब्द ।।**

**शब्दातून भक्ती, शब्दातून सृष्टी,**
**शब्दातून उलगडे, चराचर ।।**

**शब्दांचे विभ्रम, शब्दांची आरास,**
**शब्दांची मांदियाळी, साहित्यात ।।**

**शब्दातून वाद, शब्दांनी प्रतीवाद,**
**शब्दाविना संवाद, असंभव ।।**

**शब्दांचे आलाप, शब्दांचे विलाप,**
**शब्दांतून उद्रेक, भावनांचा ।।**

**शब्दातून आरंभ, शब्दातून अखेर,**
**शब्द अखेरचे, 'हे राम' ।।**

**– मंदार पानवलकर.**

# संगीताच्या बागेतले ब्रह्मकमळ



१९४१ सालचा ऑक्टोबर संपून नोव्हेंबर उजाडला होता तरी पुण्याला अजून थंडीची धूळभेटही घडली नव्हती. संध्याकाळच्या वेळी तर आळसावलेला ऑक्टोबरच अजून रेंगाळतो आहे असं वाटायचं. पुण्याचं वर्णन अनेकांनी अनेक परीनी केलं आहे. पण सकाळ-संध्याकाळ नियमाने फिरायला जाणा-यांचं शहर म्हणजे पुणे असंही पुण्याचं वर्णन करता येईल. ४१ साली पुण्याचा टिळकरोड आजच्यासारखा वाहनांनी गजबजलेला नसे. रिक्षावल्यांची डुक्कर-मुसंडी तर तेव्हा नव्हतीच. सायकल हेच त्या काळातलं पुण्यातलं लोकमान्य वाहन. सायकलींचे तांडेच्या तांडे अख्खा रस्ता अडवून वेगानं जात, तरी देखील टिळकरोड ओलांडायला पांढरे पट्टे लागत नसत. अगदी आरामात इकडून तिकडे जात येत असे. स. प. कॉलेजच्या पलीकडे स्वारगेटच्या दिशेनं अनेक बंगल्यांनी डोकी वर काढायला सुरूवात केली होती. पण 'वस्ती वाढते आहे' असा इशारा देण्याइतपत त्या बाजूची वस्ती वाढलेली नव्हती. हिराबागेत गाण्याच्या मैफली झडत, पण त्या आम श्रोत्यांसाठी नसत. हिराबागेचा कोपरा हे कुणाच्या तरी गाठीभेटीचे संकेतस्थळ मात्र जरूर होते. याच हिराबागेच्या कोपऱ्यावर संध्याकाळी पावणे सहाच्या सुमारास एक 'म्हातारे अर्क' 'एका तरुण तुकाची' रोज न चुकता प्रतीक्षा करीत उभे असायचे. डोक्यावर किंचित तिरकी गोल काळी टोपी, तुकतुकीत गौरवर्णीय भालप्रदेश, नाकाखाली व्यवस्थित कात्री फिरलेल्या मिशा, बंद कॉलरचा, बहुधा तपकिरी रंगाचा वुलन कोट, पायघोळ नव्हे पण अगदी गुडघ्यापर्यंतही नव्हे असं मर्यादेत रुळणारं ऐसपैस निऱ्यांचं ब्राह्मणी धोतर आणि हातात जाडसा सोटा अशी ती ऐटबाज मूर्ती तिथं उभी असे. गायनाचार्य पं. रामकृष्णबुवा वझे या नावांन संगीताची सारी दुनिया त्या मूर्तीला ओळखे, तेव्हा पुणे त्यांना ओळखत नव्हते, असं कसं म्हणता येईल ? अनेकांचे नमस्कार झडायचे, बुवांनी ते झेलून परतफेड करायची. पण बुवांची भेदक नजर मात्र धुंदीत असायची स्वारगेटच्या बाजूनं सायकल दौडवीत येणाऱ्या त्या तरुण तुर्काला.

तो 'तरुण तुर्क'ही तसाच कसलेल्या पैलवानासारखा रुबाबदार. रोज सकाळी टिळक रोडवरील शिवा दामल्यांच्या महाराष्ट्र मंडळात व्यायामासाठी जाणारा. ऐन एकविशीतला. वझे बुबांएवढी गौरकांती नव्हती पण होता गोराच. त्यामुळे कानांच्या पाळयांवर सकाळी लागलेल्या शेंदराच्या टिकल्या मोठ्या उठून दिसायच्या. नागपुरी रुंद काठाच्या धोतराचा ऐटबाज काचा मारलेला असायचा. अंगात स्काऊट फॅशनचा खाकी शर्ट, सुसाट तान घुसावी तशी सायकल घुसे आणि बुवांच्या पुढयात कचकन ब्रेक लावून स्वारी खाली उतरे. मग बुवा म्हणायचे, 'अरे वसंता,वाजले किती? वानवडीहून हिराबागेपर्यंत यायला इतका वेळ? केव्हाचा तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलोय', 'मिलिटरी अकाऊंटसचं ऑफिस आहे ते बुवा. बॉस हलल्याखेरीज जागेवरनं उठता येत नाही.'

'बरं चल आता, आणखी वेळ गमावू नकोस.' मग ही दुक्कल फिरायला निघायची. आजचे वसंतराव तेव्हाही काळजाला स्पर्श करणारं गाणं गात असत. पण वझे बुवांची दोस्ती गाण्यातली नव्हती. वसंता गातो हे बुवांना मुळी ठाऊकच नव्हतं. आपल्या शेजाराला भाडयानं खोली घेऊन राहाणारा, तालमीचा षोक असलेला, कारकुनी पेशातला एक उत्तम खवय्या, नागपुरी तरूण एवढीच बुवांची आणि वसंतरावांची

ओळख. एक गाणं सोडून दुनियेतल्या इतर हजारो गोष्टीवर दोघात चर्चा व्हायची. वसंतरावांना बुवांच्या गाण्याइतकंच त्यांच्या खाण्याचं कौतुक. सूर्योदय होताच बुवा चांदीच्या भल्या मोठया वाटीत बंदा रुपया टाकून बारा आण्याचं वाटीभरून लोणी आणण्यासाठी कुणातरी शिष्याला पिटाळीत. सपाट वाटीभरून ते लोणी घरी आले की ते एका दगडी खलात ओतलं जायचं. त्यात वाटी-अर्धवाटी पिठीसाखर घालून एक शिष्य 'मर्दनम् गुणवर्धनम्' करीत बसे. लोणी-साखरेचं चांगल सात्म्य झालं की ती वाटी भरून शिष्य बुवांच्या हाती देई,खलात उरलेला प्रसाद शिष्यवर्ग चाटूनपुसून फस्त करीत असे. बुवा मात्र हाती लोणीसाखरेची वाटी आली की तर्जनीनं जिभेवर 'केशवायनमः' 'नारायणाय नमः' अशी चाटणसंध्या सुरू करीत ! आणि संध्याकाळचं या दोघांचं फिरायला जाणं म्हणजे काय, सगळी सवय्येगिरीच !

'वसंता, गोवर्धन मंडळाकडून जाऊया रेऽऽ आत्ताच गेलो तर धारोष्ण दूध मिळेल.' बुवा म्हणायचे. अर्धा अर्धा लिटर (त्या काळात हे माप नव्हतं, चटकन कळावं म्हणून लिटर) मंडळात पिऊन व्हायचं. बाहेर वाटेवर केळीवाला भेटेच. डझनभर केळी दोघात वाटली जायची. त्यातीलच दोन बुवा खिशात टाकून ठेवायचे.त्याचं प्रयोजन हिडत हिंडत बाहुलीच्या हौदानजिकच्या मथुरा भुवनच्या फळीवर बसल्यावर लक्षात यायचं. बुधवारातलं हे हॉटेल 'दूध की लोटी' बद्दल जसं प्रसिद्ध होतं तसंच गरमगरम भज्यांबद्दलही होतं. बुवा आणि वसंता फळीवर बसूनच भज्यांचा एक संबंध घाणा फस्त करायचे. मग बुवांच्या खिशातून ती काढून ठेवलेली केळी बाहेर पडून कढईत बुडी घ्यायची. 'शेवटचा गोड घास' असं बुवा केळयांची भजी खाताना म्हणायचे इतकंच. पण तो 'शेवटचा गोड घास' नसेच. मथुरा भुवनसमोरच एक बासुंदीचं दुकान होतं. तिथली पत्रावळीवर दिली जाणारी आणि तरीही सांडलवंड न होणारी बासुंदी ओरपल्याखेरीज या दोघांची आपोष्णी व्हायची नाही ! शेजार आणि खवय्येपणातून झालेली दोघांची ओळख पुढं गवय्येपणापर्यंत कशी गेली तो किस्सा गहिवरून टाकणारा आहे.

दोन-अडीच वर्ष तरी बुवांना वसंता 'आ' करू शकतो, ख्याल पेश करू शकतो हे मुळीच ठाऊक नव्हतं. वसंता मात्र, बुवा त्यांच्या शिष्यांना तालीम देत असले की तिथं जाऊन बसायचा. बुवांच्या पुढयातलं तबक ओढून घेऊन पान जमवायचा. पुढं बुवांच्या एका शिष्याला त्याच्या घरी वसंतरावांनी विचित्र अवस्थेत बघितलं. स्पाँडिलायटिस झाल्यावर हल्ली गळ्याभोवती जसा पट्टा बांधतात तसा पट्टा त्या काळात नव्हता. तरीही त्या शिष्याच्या गळ्याभोवती काहीतरी गच्च आवळून बांधलेलं आहे. हे पाहिल्यावर वसंतरावांनी विचारलं, 'काय रे, झालं काय गळयाला तुझ्या ? काही नवा आजार ? '

'झालेला नाही. पण होऊ नये म्हणून साजुक तुपातील शिऱ्याचं पोटीस बांधतो मी रोज घरी आल्यावर.'

'रोज साजूक तुपातल्या गरम शिऱ्याचं पोटीस ?'

'दुसरा इलाजच नाही !'

'तालमीचा ताण पडतो ?'

'हो ना. बुवा पांढरी चार, पांढरी पाच मध्ये तालीम देतात. मला एवढा उंच स्वर झेपत नाही.'

'मग बुवांना सरळ सांगत का नाहीस की दोन स्वर खाली उतरून तालीम द्या म्हणून ?'

'काय शहमत आहे माझी तसं सांगण्याची? खाडकन तालीमच बंद करून टाकतील. माझी सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन बुवा विनामूल्य विद्या देतात हेच केवढं तरी ऋण आहे त्यांचे माझ्यावर !'

'म्हणून काय झालं? जन्माचा खराब करून घेशील ना गळा. तू स्पष्ट सांगच बुवांना---'

'अशक्य ! या जन्मी माझ्याकडून ते होणं नाही.'

'मग मी सांगतो. लावतो निकाल या गोष्टीचा. कशी होते बघूच या. उद्याच लावतो निकाल या गोष्टीचा.'

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी नेहमीप्रमाणे फिरणं आटोपलं. शिष्याची तालीम सुरू झाली. अति वजनदार गमका बुवा सांगू लागले. वसंतरावांनी बुवांना हटकलं. म्हणाले, 'बुवा काय अवस्था करून टाकल्येत त्या बिचाऱ्याची. घरी गेला की गरम शिऱ्याचं पोटीस बांधावं लागतंय त्याला गळ्यावर. दोन पट्टया स्वर खाली करून नाही देता येत तालीम तुम्हाला ?'

सवाल ऐकताक्षणी बझेबुवांच्या भिवया दोन सुतं वर चढल्या, आवाज आणखी उंचावला ! एक

फर्मास शिवी हासडून बुवा म्हणाले, 'तुला रे पैलवानी करणाऱ्याला दोन पट्ट्या वरखालीत काय कळतंय?'

'हां बुवा, काय कळतंय असं म्हणू नका. हम भी कुछ कम नाही. टप्पा, ठुमरी भजन म्हणाल ते ऐकवतो. आत्ता इथल्या इथं. याच बैठकीवर!'

'वश्याऽऽ काय भकतोस काय? तूं आणि गातोस?'

'अगदी मजेत गातो, मस्तीत गातो, ऐकवतोच आता तुम्हाला.'

'चढवा रे तंबोरे अर्धा स्वर उंच !' वसंतरावांनी बुवांच्या शिष्यवर्गाला आदेश दिला.

बुवा आश्चर्यदिङ्मूढ झाले होते. म्हणाले, 'काळी चारमध्ये गाणार तू?'

'पाचमध्येही गाऊ शकेन. पण आत्ता चारच पुरे.'

आणि मग वसंतरावांनी ख्यालाचं तोंड टाकताच बुवांचे डोळे बोलू लागले. मस्तीनं मुसमुसणारी ती आदत, ती जिगर, तो हिसाब आणि ते सुरेलीपण पाहून बुवा ढळढळा रडू लागले ! स्फुंदून स्फुंदून ! अगदी एखाद्या लहान मुलासारखे ! मनाच्या कप्प्यात कुठंतरी संतापाचा अंगार होता तो त्यांनी शिष्यवर्गावर फेकला. म्हणाले, 'चालू लागा माझ्या पुढयातून. एकटा वसंता बसू दे इथे !'

अजूनही अश्रू ओसरले नव्हते. बुवांच्या हृदयात कुठेतरी खोल जखम झाली होती हे उघड आहे. पण आता शब्दाचे अंगार विझले होते. स्फुदतच पण प्रेमानं म्हणाले, 'वसंता, हे शोभले का रे तुला? अडीच वर्ष माझ्या सहवासात आहेस. गातोस पण एकदा देखील माझ्याकडून एखादी चीज घ्यावी असं वाटलं नाही तुला?'

'खरं सांगू बुवा. पुण्याला येतानाच इतकं सामान घेऊन आलोय मी बरोबर की अजून तेच ठाकठीक लावायचं राहून गेलंय. आतली आवराआवर आणि मांडामांड नीट झाल्याशिवाय बाहेरचा नवा डाग कशाला आणून टाकायचा त्या पसाऱ्यात? म्हणून आपल्याकडे नवी चीज नाही मागितली.'

'पण मग गाण्याच्या संदर्भात एका अक्षरानंही बोलला नाहीस माझ्याशी इतक्या महिन्यात ते का? मी काय सक्तीनं घशात कोंबणार होतो चीज तुझ्या? माझ्यासारख्या म्हाताऱ्याशी लपंडाव खेळलास, शोभलं हे तुला?'

'माझा तेवढा हक्कच आहे बुवा तुमच्यावर. नातवानं आजोबांच्या मिश्या ओढायच्या नाहीत, त्यांच्याशी लपंडाव खेळायचा नाही, तर दुसऱ्या कुणी?'

'मी तुझा आजोबा ! ते कस काय?'

'आपण मास्टर दिनानाथांचे गुरू आणि दिनानाथ माझे गुरू. या नात्यानं तुम्ही माझे आजोबाच होत नाही का?'

नातवानं आजोबांना निरुत्तर केलं होतं ! वसंतरावांनी आयुष्यात असं अनेकांना निरुत्तर केलं आहे. ते पुण्यात ४० सालच्या पूर्वार्धात आले तेव्हा पुण्याची संगीतसृष्टी अनेक मातबरांनी गजबजलेली होती. पुण्यातील मारुतीची ठळक ठळक देवळं मोजावीत तशी ही मातब्बर मंडळी मोजता येत होती. शिवाजी नगर स्टेशनच्या बाहेर पडता क्षणी पं. मिराशीबुवा, शनिवारवाडयाला डावी घालून अप्पा बळवंत चौकाकडं वळलं की जमखिंडीकरांच्या वाडयात पं. विनायक बुबा, शनीच्या पारापाशी कै. भास्करबुवांच्या गायन समाजात पाटणकर बुवा, भारत इतिहास संशोधन मंडळानजिक वझे बुवा, महाराष्ट्र मंडळाच्या पिछाडीस मास्तर कृष्णराव, जंगली महाराजांच्या सन्निध केशवराव भोळे, तिकडे श्रीमती हिराबाई, शुक्रवारात सुरेशबाबू, लकडी पुलापाशी, गंधर्व नाटक मंडळीचे सारंगिये कादरबक्ष यांचे सुपुत्र उस्ताद मोम्मद खान, शुक्रवारात वैद्य पांडुरंग शास्त्री देशपांडे यांच्या घरी धाब्यात बसून रियाझ करण्यासाठी पं. भीमसेन अजून यायचे होते आणि सवाई गंधर्व अर्धांगाच्या झटक्यानं अंथरुणाला खिळून होते. असा सगळा कोष फुललेला होता पुण्यात. पण वसंतरावांनी निवड केली ती सुरेशबाबूंची. सुरेशबाबू हे शापित कलाकार आहेत, त्यांच्या शिक्षणाचा प्रकाश पडणार नाही असं दिनानाथानी सांगितले असतानाही आपल्याला जे संगीत शिकायचे आहे ते सुरेशबाबुकडेच आहे याची मनोमन खात्री पटून ते त्यांच्याकडे गेले.४२ ते ५२ या दशकात मला संगीताची नजर आली असं वसंतरावांनी एकदा सांगितलं आहे. सुरेशबाबू ५३ साली गेले हे ध्यानात घेतले म्हणजे या

दशकात वसंतरावांना जी नजर आली तीत सुरेशबाबूंचा वाटा फार मोठा असला पाहिजे हे उघड आहे.

गाणं घेत जाणं आणि नजर येणं या दोन भिन्न गोष्टी आहेत. नागपूरहून अमरावतीपर्यंत फेऱ्या मारून वसंतराव दिनानाथांची गायकी उचलीत होते.पुढं १९३८ साली, मामा नॉर्थ वेस्टर्न रेल्वेतील नोकरीत लाहोरला बदलून गेला म्हणून वसंतराव लाहोरला गेले. 'मातुल सर्वनाशाय' सुभाषित कोण्या गाढव विद्वानाने रचले माहीत नाही. वसंतरावांच्या आयुष्याकडे बघितल्यावर 'मातुलो भाग्य वृद्धए' असा चरण दुरुस्त करून घ्यावा लागतो. वसंतरावांना दिनानाथांच्या पायावर घातलं ते त्यांच्या मामानंच आणि पंजाबात असदअली खां, बरकत अली, बडे गुलामअली यांच्याकडून फार मोठं सांगीतिक धन वसंतरावांनी कसं मिळवावं याची युक्ती सांगितली, तिही मामानंच. वसंतरावांच्या तोंडून ही पंजाब भ्रमणाची कथा ऐकण्यात मोठी गंमत असते.

१९२८ साली मामानंच धाडलेला रेल्वेपास घेऊन वसंतराव लाहोरला गेले. लाहोरला गांधर्व महाविद्यालय होते.पण तिकडे ते क्वचितच भेटीगाठीसाठी गेले.पतियाळा गायकीने त्यांना आकर्षून घेतलं होतं. तिच्या शोधात रमले. नायकिणीच्या कोठया हिंडले, तेव्हा असं लक्षात आलं की हैदरबक्षांसारखे उत्तमोत्तम सारंगिये देखील


## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**

**श्री. रोहित गवळी – 9657963475**


सकाळी आठ वाजता काखेत सारंगी मारून जमीनदारांच्या म्हशी घेऊन गुरचरणीसाठी रानात जातात. तिकड म्हशी जेवढ्या संथपणाने चरत असतात, तेवढयाच संथपणान इकडे झाडाखाली बसून यांचा रियाज चालत असे. रात्र झाली की चालले नायकिणीच्या कोठयांवर साथ करायला. त्यावरच पोट चाले. या वादकांना मिराशी म्हणत. वसंतासारखा दखनी ब्राह्मण त्यांच्याशी भर रस्त्यात बोलतो हे आर्य समाजिस्टांना खपत नसे. लाहोरमधे गाण्यात गुरफटून गेलेलं वसंतरावांचं एक टोळकं होतं. त्यांना यांची दया येई. विशेषत्वानं बडे गुलामअलीची. त्यांनी एकदा बडे गुलाम अलींचा सत्कार करायचं योजलं. वर्गणी जमवली. आटोकाट प्रयत्न करून चाळीस रुपये जमले. तरी डगमगले नाहीत. हॉल भाडयानं घेतला.बारा आण्याचा एक रेशमी रुमाल खरीदला. खासाहेबांना येण्या-जाण्यासाठी तांगा ठरवला या खर्चापोटी ५ रुपये उडाले! उरले फक्त पस्तीस ! बड़े गुलामअली मोठ्या प्रेमान गायले. पोटभर ऐकवलं त्यांनी. अखेर ते ३५ रुपये नजर करण्याची वेळ आली तेव्हा वसंतरावांनाच पुढं व्हावं लागलं. रेशमी रुमालाखाली बंदे पस्तीस रुपये झाकून खासाहेबांना देताना वसंतराव म्हणाले, 'खासाहेब, हमारी बदकिस्मती हम लोग पस्तीस रुपयेही इकट्ठा कर सके! आप बुरा मत मानिये!'

'बडे गुलामअलींच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. म्हणाले, 'बेटा, बुरा क्यू मानू? मेरी इतनी भी इज्जत लाहोरके लोग करते नहीं।'

३८ साली ही कथा. त्यानंतर सहा वर्षांनी विक्रमादित्य परिषदेत बडे गुलामअलीचं गाणं मुंबईत अपरंपार गाजलं. अभुतपूर्व मारवा ऐकवून लगेच त्यावर पूरिया रंगविण्याची अजब करामत करून दाखविली बडे गुलामअलीनी!भाग्यरेषा उमटली !

लाहोरात वसंतराव होते तोवर दर दोन दिवसाआड बडे गुलामअली ऐकायला मिळायचे. आणि बरकतअलींच्या घरीच त्यांची रसेली ठुमरी ऐकायला जात. ते लोकप्रिय होते. बडे गुलामअलींच्या कुंडलीत अजून भाग्योदय नव्हता. पतियाळा शैलीचे खलीफा उस्ताद असदअलीखां तर फकीर बनून चोवीस तास दर्ग्यातच राहू लागले होते. इस्लाममधला संन्यासीच तो. तरीही त्यांच्याकडून चिजा

मिळविण्यासाठी दर्ग्यात रीघ लागे. एक पैसा दिला की एक चीज मिळे. म्हणत, लिखलो. वसंतरावांनी चाळीस दिवसात अशा प्रकारे चाळीस पैसे देऊन चाळीस चिजा लिहून घेतल्या आणि एके दिवशी मोठ्या अभिमानाने मामाला ती वही दाखविली. तेव्हा मामा वसंतरावांना म्हणाला, 'आता फक्त एक गोष्ट कर.' 'कोणती?'

'ही वही बंबात टाकून दे पाणी तापवायच्या.'

'कारे, असं का म्हणतोस? मी रोज नियमानं दर्ग्यात जाऊन चिजा उतरून घेतल्यात असदअलीखां साहेबांकडून आणि तू त्या जाळून टाक म्हणतोस?'

'अशा चिजा उतरून घेऊन गाणं येत नसतं वश्या...' 'मग काय करावं म्हणतोस?'

'मी सांगतो तसं कर. उद्या एक चांगला हार, शेरभर मिठाई, आठ आण्याचा चरस असा सगळा सरंजाम घेऊन जा दर्ग्यात आणि तो खां साहेबांच्या पायावर अर्पण करून गंडा बांधून शिकवा म्हणून आग्रह धरा ! मग बघ काय गंमत होते ती !'

अठरा वर्षांची उमर होती त्यावेळी वसंतरावांची. मामाकडून दोन बंदे रुपये घेऊन वसंतराव बाजारात गेले. लाहोरात त्यावेळी २ पैसे तोळा गांजा मिळे. शुद्ध तुपातली मिठाई १० आणे शेर भावानं विकली जायची. वसंतरावांनी आठ आण्याचा चरस मागताच दुकानदार डोळे फाडफाडून वसंतरावांकडे बघत राहीला, म्हणाला बड़ा जिगरवाला दिखाई देता है लड़का । इतनीसी उमरमे ये शौक! वसंतराव मग सर्व साहित्यानिशी दर्ग्यात गेले. रोजच्या प्रमाणेच हा पोरगा चीज उतरून घेण्यासाठी आला असेल असं वाटून खासाहेब म्हणाले, 'आवो आवो बेटा, लिख लो !'

'नहीं नहीं खासाहब, चीज लिखनेके लिए नही आया हूँ आज. आज कुछ और बातके लिये बांदा हाजिर है, आज तक जितनी चिजे लिखी थी वे सब मैने कुवेमे फेंक दी है। आज मेहरबानी करके मुझे गंडा बांधिये और बाकायदा सिखाईए।'

एकीकडे ही विनंती करीत असतानाच वसंतरावांचे हात पुडया सोडण्यात गुंतले होते. ती मिठाई तो चरस वगैरे पहातच असदखासाहेबांना अलिबाबाच्या गुहेत शिरल्याप्रमाणे वाटलं असावं. त्यांच्या डोळयांत आनंद मावेना. दर्ग्यात चार पाच फकीर होते. त्यांना त्यांनी खूण केलो. सगळे जमले. काय काय करायचं ते त्यांना ठाऊकच होतं. रोगी टेबलावर घेतला की एनेस्थेशिया देणारा डॉक्टर जसा कामाला लागतो तसे ते पूर्व तयारीला लागले. चरस ओढणे हा एक अजबच विधी असतो. खोबरेल तेलाचा दिवा, लांब नळी, कुशीवर पडून धुराचा आस्वाद, कितीतरी तंत्रं ! ती सगळी पार पडली. प्रत्येक फकिराच्या विमानानं टेक ऑफ घेतला. मग त्यावर मिठाईचा आस्वाद. वसंतराव बिचारे दर्ग्यापुढील , सिमेंटनं बांधून काढलेल्या विहिरीच्या कट्ट्यावर बसून, सगळी गंमत बघत होते. आता असदअली खा साहेबांसह ते सर्व फकीरही विहिरीच्या कट्ट्यावर येऊन बसले. मग गंडाबंधन झालं. गुरुपदेशाचा राग कोणता असावा हे सुचविण्यासाठी खांसाहेब म्हणाले, 'अभी तो शाम हो रही है, मारवा सिखाऊं?'

'हो हो, जरूर सिखाइये !'

'पहिले तुम थोडा शुरू तो करो, कैसा गाते हो बताओ !'

वसंतरावांनी मारवा सुरू केला. त्यावेळेपर्यंत समजला होता तेवढा गायले. त्यांच्यामागून ते पाच फकीरही तब्येतीत गायले. शेवटचा मान अर्थातच खांसाहेबांचा. त्यांनी त्या षड्जपंचम विरहित आणि कोमल ऋषभाची पुनः पुन्हा आंस दाखविणाऱ्या रागात शुद्ध धैवत हा केवळ सायंकालीन ध्यानधारणेसाठीच कसा असतो याची प्रचीती जेव्हा आणून द्यायला सुरुवात केली, तेव्हा वसंतरावांना दुपारपासूनच्याच नव्हे तर लाहोरात आल्या दिवसापासून केलेल्या श्रमाचं सार्थक झालं असं वाटलं. चार पाच महिने मारव्याचीच तालीम चालू होती दर्ग्यात. वसंतराव मारव्यात घुसले म्हणजे मैफिलीतल्या श्रोत्यांना किती अंतर्मुख बनवितात याचा प्रत्यय अनेकांना आला असेल. मुंबईत पी.एल.च्या साथीत, इंडियन मर्चन्टस् चेंबरच्या वातानुकूलित हॉलमध्ये, ठिच्च गर्दीत त्यांनी सव्वा एक तास हजार श्रोत्यांना मारव्यात कसं ध्यानमग्न केलं होतं त्याची मला याद आहे. त्या मारव्याचं मूळ लाहोरच्या या गंडाबंधनात मिळतं.

पंजाबात वसंतरावांना काय म्हणून मिळाले नाही? तानके कप्तान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फत्तेअलींचे चिरंजीव आशिकअली यांच्याशी दोस्ती झाली ती पंजाबातच !



# रक्तदाता शतकवीर

स्वातंत्र्यपूर्वीचा काळ होता. राजापुर तालुक्यातील प्रभाकर हरी सोहनी ही व्यक्ति दिनांक ९/३/१९४२ रोजी जन्माला आली. त्यांच्या आईचे नांव जानकीबाई. अठरा विश्वे दारिद्र्य होतं त्यांच्या घरी. परिस्थिती खूपच हलाखीची होती. वडील मुंबईला खाजगी कंपनीत नोकरीला होते. आई, मुलगा व मुलगी अशी तिघंजण गावाकडे राहून कष्ट करून आपला उदरनिर्वाह करीत. वडील थोडेसे पैसे पाठवित असत. घरात सोहनी यांचे चुलते वगैरे होते. पण भाऊबंदकीमुळे या कुटुंबाला कोणीच मदत करीत नसत. सोहनी यांचे ७ वी पर्यंतचे शालेय शिक्षण शेडे गावच्या प्राथमिक शाळेतच झाले. दिवस जात होते. अचानक या कुटुंबावर मोठा आघात झाला. त्यांचे वडील अकस्मात स्वर्गवासी झाले आणि त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. आता काय करावं? मोठा प्रश्न उभा राहिला. आता त्यांना काहीतरी धंदा पोटापाण्यासाठी करावाच लागणार होता.

जानकीबाई मोठ्या धीराच्या होत्या. त्या मुलांना घेऊन तडक कोल्हापुरला आल्या. गंगावेस येथे एक भाड्याने खोली घेऊन राहू लागल्या. त्यांना शिवण येत होतं, पण मशीन घ्यायला पैसा नव्हता. हाताने कपडे शिवून त्यांनी उदरनिर्वाहाचा मार्ग शोधला. दरम्यान मुलांचे हायस्कूल शिक्षणही चालले होते. हळूहळू त्यांनी शिवणकोर्स पूर्ण केला, मशिन घेतली व आता बऱ्यापैकी परिस्थिती सुधारू लागली. सोहनी हे शाळेतून आल्यावर पुस्तक बायडिंगचेही काम करीत. त्यातूनही त्यांना थोडा आर्थिक भार संभाळायला मदत होत होती.

दोन्ही मुलांचे मॅट्रिक शिक्षण पूर्ण झाले. परिस्थिती अभावी कॉलेजला त्यांना जाता आले नाही. परंतु सोहनी यांनी टायपिंगच्या परीक्षा दिल्या. शार्टहँडच्याही परीक्षा दिल्या. त्यामध्ये त्यांनी प्रभुत्व मिळवले आणि त्या हुशारीवर त्यांना एम्.एस्.ई.बी. मध्ये नोकरी मिळाली. त्यांचे काम परफेक्ट असायचे. यांनी तेथे प्रामाणिकपणे ८ वर्षे नोकरी केली. याच कालावधीत आपल्या बहिणीचे लग्न करून देऊन कर्तव्य पार पाडले. ती पुण्याला असते. तिची परिस्थिती उत्तम आहे.

अशाप्रकारे त्यांचे कष्टमय जीवन सुरू होते. प्रामाणिक कष्ट करण्याऱ्या माणसाच्या पाठीशी परमेश्वरी कृपा असतेच. सोहनी यांच्या प्रामाणिकपणामुळे अजून एक नोकरीची संधी मिळाली. ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. मध्ये त्यांना नोकरी मिळाली. आता त्यांच्या जीवनात थोडेफार स्थैर्य आले. आता ते वयात आल्यामुळे मुली सांगून येऊ लागल्या. १९७२ मध्ये पुष्पलता सदाशिव देवघर ही मुलगी सांगून आली व त्या दोघांचा विवाह संपन्न झाला. त्याची सुद्धा एक गंमत आहे. पुष्पाच्या आधी जेव्हा मुली दाखवायला यायच्या त्यावेळी त्यांना वाईट साईट स्वप्ने पडायची. किंवा दोघांचा ॲक्सिडेंट दिसायचा, निगेटिव्ह गोष्टी दिसायच्या. मात्र पुष्पाची पत्रिका आली त्यावेळी रात्री श्रीधर स्वामी (पुणे) यांनी त्यांना दृष्टांत दिला व हात वर करून आशीर्वाद दिला. सोहनी यांची आई श्रीधरस्वामींची भक्त होती. तिने त्यांच्याकडून अनुग्रह घेतला होता आणि या गुरुकृपेमुळे या दोघांचा विवाह संपन्न झाला.

त्यानंतर पुढे २-४ वर्षांनी सोहनी यांच्या आईला देवाज्ञा झाली. या दोघांनीही गुळवणी महाराज पुणे यांचा अनुग्रह घेतला व गुरुआज्ञा पाळून त्यांची नित्यनेमाने उपासना करून त्यांचे जीवन व्यवस्थित सुरू होते. त्यांना आध्यात्मिक बळ मिळत गेले. त्यांच्या नोकरीच्या कालावधीत २-४ वेळा त्यांना ॲक्सिडेंटलाही तोंड द्यावे लागले, पण गुरुकृपेमुळे सर्व निभावून गेले.

सोहनी हे लोकांना प्रिय होते. त्यांनी कधी कुणाला दुखावले नाही. त्यांचे इंजिनियर झालेले मित्रही त्यांची आस्थेने चौकशी करायला यायचे. खूप सधन परिस्थिती नसतानाही समाजऋण म्हणून अनेक सामाजिक संस्थांना आपल्या ऐपतीप्रमाणे त्यांनी मदत केली आहे. (१)स.म. लोहियाची मुक बधिर शाळा, (२) जीवन मुक्ती संघटना, (३) ज्येष्ठ नागरीक संघ आर के नगर, (४) आर के नगर येथील हायस्कूल (गुणवंत

विद्यार्थ्यांना बक्षिस योजना)

समाजसेवा व मदतीचा हात पुढे करणे हा त्यांचा स्थायीभाव होता. स्वत:च्या गरीब परिस्थितीची जाणीव ठेवून ते मदतीचा हात पुढे करायचे.

आपल्या कारकीर्दीत १०९ पेक्षा जास्त वेळा त्यांनी रक्तदान केले आहे. ही स्फूर्ती त्यांना त्यांच्या आईच्या ऑपरेशन प्रसंगातून मिळाली. १९६०/६१ च्या दरम्याने त्यांच्या आईचे कसले तरी ऑपरेशन होते. त्यावेळी तिला रक्ताची गरज होती. रक्तपेढीतून रक्त घ्यायचे म्हणजे पैसे पडणार म्हणून आपणच आईसाठी रक्त देऊया असे म्हणून त्यांनी आईसाठी रक्त दिले आणि विशेष म्हणजे ते रक्त आईला सूट झाले. मग त्यांनी निर्धार केला की गोरगरीबांसाठी, ज्यांना रक्त विकत घेण्याची ऐपत नाही, अशांना जीवदान मिळावे या उदात्त हेतूने त्यांनी रक्तदान करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांना तो छंदच जडला. अनेकांना त्यांच्या या रक्तदानामुळे जीवदान मिळाले असेल. त्यांच्या या उदात्त हेतूला व कर्तव्याला त्रिवार वंदन ! त्यांची आईसुद्धा ऑपरेशन नंतर १५ वर्षे जगली. अशा या मातेलाही कोटी कोटी प्रणाम ! १९९७/९८ च्या दरम्याने सोहनी यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्यांना काही अपत्य नव्हते ही सुद्धा गुरुंचीच इच्छा असावी. पण ही दोघेही जण हसून खेळून आपले जीवन व्यतित करीत होती. सोहनी कधी रिकामे बसायचे नाहीत. शिवण, घड्याळ दुरुस्ती, मिक्सर दुरुस्ती, बागकाम अशी कामे करीत रहायचे.

पुष्पा सोहनी व मी आम्ही दोघी माहेरच्या गांवच्या, पोंभुर्ल्याच्या मैत्रिणी आणि कोल्हापुरलाही नंतर दोघी एकाच शहरात राहिल्यामुळे मैत्री कायम राहिली. एकमेकांची सुख दुःख जाणून घेण्याची ओढ राहिली. सोहनी यांच्या रक्तदानाची माहिती घराघरात पोहोचवावी या हेतूने यांच्या जीवनातील चढउतार याचा आढावा इथे देत आहे. ते हयात नसले तरीही त्यांच्या या उपक्रमाबद्दल तरुणांमध्ये जागृती होऊन त्यांनाही हा छंद जडावा हाच हेतू !

पहिल्यांदा ते गंगावेशीत भाड्याच्या घरात रहात होते. पण नंतर त्यांनी आर. के. नगर येथे स्वतःचे घर बांधले व सुखाने राहू लागले. असे जीवन सुरळीत सुरू असतानाच त्यांना आजारपण आले आणि त्यातच ते मार्च २०११ मध्ये अनंतात विलिन झाले. तेव्हापासून त्यांची बायको पुष्पा ही त्या घरात गुरुंच्या सानिध्यात एकटी रहाते. गुरुंची शिष्यावर एवढी अपार कृपा आहे की तिला एकटीला भीती वाटत नाही. गुरुंचा खूप मोठा आधार आहे. तिची श्रध्दा व भक्ती अपार आहे.

आपल्या नवऱ्याचा रक्तदानाचा संकल्प घराघरात पोचावा म्हणून तिने मोठ्या मनाने आपल्या कोल्हापूर चित्पावन संघाला त्यांच्या स्मरणार्थ भरीव आर्थिक देणगी दिली आहे. तिच्या या दातृत्वाला मानवंदना !


परमेश्वराने तिला आरोग्यसंपन्न आयुष्य द्यावे अशी मी श्रीचरणी प्रार्थना करते ! जयहिंद ! जय महाराष्ट्र !

**सौ. नीता चंद्रकांत गोगटे,** कोल्हापूर

---

**दिनविशेष (जुलै २०२३)**
**आषाढ-अधिक श्रावण १९४५**
**शोभननाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**शनिवार दि. १ :** महाराष्ट्र कृषी दिन, डॉक्टर्स डे, **सोमवार दि. ३ :** गुरुपौर्णिमा, **मंगळवार दि. ४ :** वीर बाजीप्रभू देशपांडे पुण्यतिथी, **गुरुवार दि. ६ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो.१०.०७), **सोमवार दि. १० :** मातृसुरक्षा दिन, **मंगळवार दि. ११ :** जागतिक लोकसंख्या दिन, **गुरुवार दि. १३ :** कामिका एकादशी, वीर शिवा काशीद पुण्यतिथी, **शनिवार दि. १५ :** संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा, **रविवार दि. १६ :** संत सावतामाळी पुण्यतिथी, **मंगळवार दि. १८ :** अधिक श्रावण मासारंभ, **रविवार दि. २३ :** लोकमान्य टिळक जयंती, वनसंवर्धन दिन, **शनिवार दि. २९ :** मोहरम, **सोमवार दि. ३१ :** नाना शंकरशेठ पुण्यतिथी.

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर
# शैक्षणिक पारितोषिक योजना २०२३-२०२४
(फक्त सभासदांचे मुलामुलींसाठीच)

## शैक्षणिक अर्हता व बक्षिसे

१. **प्राथमिक शाळा स्तर –** १ ली ते ४ थी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

२. **माध्यमिक –** ५ वी ते ९ वी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

३. **स्कॉलरशिप परीक्षा –** ४ थी व ७ वी परीक्षेत यश मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

४. **हायस्कूल स्तर/एस.एस.सी. –** इयत्ता १० वी स्तरावर प्रथम येणारी मुलगी, प्रथम येणारा मुलगा, तसेच इंग्रजी, गणित, संस्कृत व मराठी या विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

५. गणित प्रज्ञा परीक्षा, MTS, NTS परीक्षा इ.क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

६. **कनिष्ठ महाविद्यालय/एच.एस.सी. –** इ. १२ वी (तीनही शाखा) मुलांत प्रथम, मुलीत प्रथम, तसेच इंग्रजी, गणित आणि संस्कृत विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

७. **पदवी स्तर –** कला, शास्त्र आणि वाणिज्य या तीन विद्याशाखांत तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्यांना बक्षिसे.

८. **पदव्युत्तर स्तर –** कला, शास्त्र, वाणिज्य, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखांत तसेच एम.सी.ए. मध्ये प्रथम येणाऱ्या पाल्यांसाठी बक्षिसे.

९. **विशेष बक्षीस योजना –** एमबीबीएस, एम.टेक., सीए, आयसीडब्ल्यूए. तसेच ललित कला, संगीत कला, वक्तृत्व कला, क्रीडा, चित्रकला इत्यादी क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

१०. **पत्रकारिता शिक्षणासाठी उत्तेजनार्थ बक्षीस**
मागील वर्षापासून बक्षिसामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

११. **इ. १ ली ते ९ वी –** प्रत्येकी तीन क्रमांक.

१२. **इ.४ थी व इ. ७ वी –** स्कॉलरशिप – प्रत्येकी तीन क्रमांक.

१३. **इ. १० वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम, २. विषयवार बक्षिसे (प्रथम व द्वितीय) – अ. इंग्रजी, ब. गणित, क.संस्कृत, ड.मराठी, इ. विज्ञान

१४. **इ. १२ वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम (शाखानिहाय),
२. विषयवार (शाखानिहाय – प्रथम व द्वितीय) –
अ. इंग्रजी, ब.गणित, क.संस्कृत, ड. विज्ञान,

१५. **शाखानिहाय पदवीधर –** आर्टस्, कॉमर्स, सायन्स, इंजिनिअरींग, मेडिकल, एल्.एल्.बी.

१६. **पदव्युतर –** एम्.ई. एम्.टेक्., सर्जरी, एल्एल्.एम्., एम्.ए. एम्.कॉम, एम्.एस्सी., एम.बी.ए., सी.ए.,UPSC, MPSC

१७. **प्रवेश परीक्षा –** सी.ए.(CPT) एन.डी.ए.(Foundation) आय.आय.टी. (JEE) आय.सी. डब्ल्यू, व सी.एस्.(Foundation)

१८. गरजू, होतकरू विद्यार्थी/विद्यार्थिनी – इ. १० व १२ वी

१९. **इतर –** वक्तृत्व,संगीत, पाककृती

२०. **पत्रकारिता –** १. शिक्षण २. विशेष योगदान

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - जुलै २०२३)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | किर्ती O +ve | देशस्थ | २/११/९१ ५.७ | भारद्वाज, सिंह उत्तरा, १ ले आद्य, मनुष्य | B.Tech. | --- | --- | मोहन कानडे मु.पो.पोखले, ता. पन्हाळा ९६३७८१११७६ |
| २. | प्राजक्ता B +ve | गौड सारस्वत | ६/८/९२ ५.१० | कौंडिण्य, वृश्चिक अनुराधा, १ ले मध्य, देवगण | B.A.M. & M.M.S. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ८ लाख | प्रसन्नकुमार बोरकर मुंडवा, पुणे. ९१६७९२९६८० |
| ३. | किशोरी O +ve | --- | २८/२/९४ ५.३ | वसिष्ठ, कन्या, स्वाती, ४ थे आद्य, देवगण | M.A. B.Lib. | --- | वा.प्रा. --- | बंडू हरिभाऊ देशमुख २२८, कसबा पेठ, फलटण ९८८१९१०८९४ |
| ४. | श्रद्धा --- | कोकणस्थ | २१/१२/९५ ५.४ | विष्णूवर्धन, वृश्चिक, आद्य ज्येष्ठा, १ले राक्षस | 12 th | --- | वा.प्रा. --- | गोपाळ नेने गावभाग, सांगली ९४२११२७२८२ |
| ५. | श्रद्धा A +ve | देशस्थ | ७/८/९६ ५.२ | भारद्वाज, वृषभ कृतिका, ४ थे अंत्य, राक्षस | B.E. (Mech) | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ६ लाख | शरदचंद्र बा. पाटील राजारामपुरी, कोल्हापूर. ९८५००४५५१४ |
| ६. | नम्रता O +ve | कोकणस्थ | ५/१/९६ ४.११ | शांडिल्य, मिथून आर्द्रा, ३ रे आद्य, मनुष्य | M.Com. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १ लाख | सुधीर गजानन केळकर माणिक बाग, पुणे. ९६२३४०२३४२ |
| ७. | प्रिया A +ve | देशस्थ | ३/८/९८ ५.१ | जमदग्नी, वृश्चिक अनुराधा, ४ थे मध्य, देवगण | B.Com, German Level 1 | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ५.२० लाख | शैलेश श्रीधर कुलकर्णी राजोपाध्ये रोड, कोल्हापूर ७०५७०७९४४८ |
| ८. | हरिप्रिया A +ve | देशस्थ | १२/२/९९ ५.३ | वसिष्ठ, धनू मूळ, ४ थे आद्य, राक्षस | B.Com. M.B.A. | कोल्हापूर येथे नोकरी | मा.प्रा. १.०८ लाख | राजेंद्र रघुनाथ रामदासी देवकर पाणंद रोड, कोल्हापूर ९८८१९३३०५ |
| ९. | वैष्णवी O +ve | कऱ्हाडे | १९/१२/९७ ५ फूट | वसिष्ठ, सिंह मघा, ४ थे अंत्य | B.A. Home Science | --- | वा.प्रा. --- | सुनिल प्रभुदेसाई स्टेशन चौक, सांगली ९४२३२६७११२ |
| १०. | निकिता --- | देशस्थ | २८/४/९७ ५.४ | वत्स, धनु, उ.षाढा, ४ थे मध्य, मनुष्य | B.E. | पुणे येथे नोकरी | मा.प्रा. १० लाख | निकिता मेढेकर मु. पो. सांगली ९८२२२४४६४३ |

**ऐश्वर्या प्रदिप मिरजकर (नाममात्र घटस्फोटीत)**

**जन्मतारीख :** २३/३/९४ **पोटशाखा :** देशस्थ

**शिक्षण :** B.Sc. Homescience (Interior Designer)

MBA Appeared **रक्तगट :** A +ve **उंची :** ५.४

**नोकरी/व्यवसाय :** पुणे येथे **वा.प्रा. :** ३ लाख

**पत्ता : श्री. प्रदिप मिरजकर**

अभिनव फार्मसी कॉलेज रोड, तुळजाभवानी मंदिरापाशी, नऱ्हे पुणे. मोबा. 9422306815 **अपेक्षा :** अनुरुप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| जमदग्नी | मीन | उत्तराभाद्रपदा | प्रथम | मध्य | मनुष्य |

**गौरी महेश खांडेकर (कऱ्हाडे) रक्तगट :** A +ve

**जन्मतारीख :** २९/८/१९९० **उंची :** ५.२

**शिक्षण :** B.E. (IT)

**नोकरी :** इन्फोसिस पुणे येथे **वा.प्रा. :** १० लाख

**पत्ता : श्री. महेश खांडेकर**

वास्तव्य - मुंबई येथे

मोबा. 8793884953

**अपेक्षा :** अनुरुप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| गार्ग्य | वृश्चिक | ज्येष्ठा | पहिले | आद्य | राक्षस |

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - जुलै २०२३)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रोहन O +ve | देशस्थ | ६/४/८८ ५.६ | काश्यप, वृश्चिक अनुराधा, मध्य, मनुष्य | B.E. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १६ लाख | अनिल यशवंत कुलकर्णी महाद्वार रोड, कोल्हापूर. ७३५०४६३९२५ |
| २. | सौरभ B +ve | देशस्थ | ५/१२/८९ ५.५ | काश्यप, कुंभ, शततारका, २ रे आद्य, राक्षस | B.E. (Mech) G.M.E. | मर्चंट नेव्हीमध्ये | वा.प्रा. १४ लाख | चंद्रशेखर गो. आळतेकर शहापूर, बेळगाव. ९३४३८४१६७२ |
| ३. | डॉ.अनुराग A +ve | कोकणस्थ | २९/९/९० ६.१ | गार्ग्य, मकर, उत्तराषाढा, १ ले अंत्य, देवगण | MBBS MS (Surgeon) | व्यवसाय | वा.प्रा. ८ लाख | डॉ. संतोष वामन बेडेकर मारुती मंदिर, रत्नागिरी ९४२१२३०१४० |
| ४. | चैतन्य O +ve | देशस्थ | २९/९/९१ ५.८ | कृष्णात्रय, वृषभ रोहिणी, ३ रे आद्य, मनुष्य | Dip. in Pharm. | कराड येथे नोकरी | वा.प्रा. ५ लाख | दत्तात्रय भांडारी कराड. ९९२२२९०४५२ |
| ५. | प्रणवकुमार B +ve | देशस्थ | २९/१०/९२ ५.६ | अत्रि, वृश्चिक ज्येष्ठा, २ रे आद्य, राक्षस | B.S.L. L.L.M. | कराड येथे वकिली व्यवसाय | वा.प्रा. ५ लाख | रविंद्र बाजीराव टोणपे सोमवार पेठ, कराड. ८७९६९४७८०४ |
| ६. | दिग्वीजय O +ve | देशस्थ | १६/५/९३ ५.३ | काश्यप, मीन पू.भाद्र, ४ थे आद्य, मनुष्य | B.E.(Mech) & Other | कोल्हापूर येथे | वा.प्रा. ३ लाख | श्रीकांत कोन्नुर कावळा नाका, कोल्हापूर ८८०५००७७१२ |
| ७. | निखिल B +ve | कोकणस्थ | ९/७/९४ ५.९ | काश्यप, मिथुन, पुनर्वसू, १ ले आद्य, देवगण | B.Com. C.A. | मुंबई येथे नोकरी | वा.प्रा. ८.२५ लाख | विठ्ठल दामोदर जोशी कोल्हापूर. ९७६२५२४३५८ |
| ८. | विवेक --- | देशस्थ | २/१/९४ ६.३ | सार्वण, सिंह मघा, तिसरे, अंत्य, राक्षस | B.Com. M.Com. | कोल्हापूर येथे बँकेत नोकरी | वा.प्रा. ११.२० लाख | दिलीप गोपाळ वाडेकर महाद्वार रोड, कोल्हापूर ९५९५६३४४७० |
| ९. | अक्षय O +ve | देशस्थ | १४/६/९५ ५.८ | सांख्यायन, धनु मूळ, ४ थे आद्य, राक्षस | B.Sc. Comuter Science | नवी मुंबई येथे नोकरी | वा.प्रा. २३ लाख | संजय पांडुरंग मार्कंडेय कर्वेनगर, पुणे ८००७७२०७८८ |
| १०. | निरंजन O +ve | कोकणस्थ | १७/५/९६ ५.६ | गार्ग्य, वृषभ, कृतिका, २ रे अंत्य | B.E (E & TC) | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ७ लाख | विजय मधुकर म्हसकर (ग्रामसेवक) अभयनगर, सांगली. ९४२३५३२६७२ बहीण आरती जोशी |

## वैभव विकास वाडीकर (देशस्थ)

**जन्मतारीख :** ८/३/१९९५ **उंची :** ५.४ **रक्तगट :** O+ ve

**शिक्षण :** B.E. Computer, M.S. Computer Science (U.S.A.)

**नोकरी :** Salesforce (U.S.A.) **वा.प्रा. :** १,१६,१५,४७२/-

**पत्ता : विकास वाडीकर**

रंकाळा पार्क, कोल्हापूर.

मोबा. 9422796672, 9371112994

**अपेक्षा :** पदवीधर, नोकरदार

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भारद्वाज | वृषभ | रोहिणी | १ ले | --- | मनुष्य |

## पवन रमेश जोशी (देशस्थ) रक्तगट : A +ve

**जन्मतारीख :** १५/१/१९९४ **उंची :** ५.३

**शिक्षण :** B.C.A. P.G.D. (IT), M.B.A.

**नोकरी :** पुणे येथे **वा.प्रा.** : ५ ते ७ लाख

**पत्ता : रमेश बळवंतराव जोशी**

पुण्याचा पत्ता : फ्लॅट नं. ३०४, अश्विनी हाईटस्, नऱ्हे, पुणे

मोबा. ९४२२६१६३४१, ९८६०४७२८६७

**अपेक्षा :** अनुरुप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| हरित | कुंभ | धनिष्ठा | ४ थे | मध्य | राक्षस |

## श्री. गुरुप्रसाद कानिटकर यांना म.सा.प. सन्मान







पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने आपल्या चित्पावन संघाचे सभासद आणि संघाचे संवर्धक कै. द. गो. कानिटकर यांचे सुपुत्र श्री. गुरुप्रसाद कानिटकर यांना सन २०२१ सालाकरिता 'कै. द. वा. पोतदार स्मृति पुरस्कार' त्यांच्या 'श्रीमंत माधवराव पेशवा : व्यक्ती आणि कार्य' या इतिहासविषयक ग्रंथासाठी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. दिनांक २४ एप्रिल २०२३ रोजी नामवंतांच्या उपस्थितीत पुणे येथे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. श्री. गुरुप्रसाद कानिटकर यांचे कोल्हापूर चित्पावन संघातर्फे आणि नवस्नेह परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन ! आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा !

## अधिक मासानिमित्त सामूहिक दांपत्य भोजन सोहळा

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे पुरुषोत्तम मासानिमित्य ३० + ३ दांपत्यभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला असून या कार्यक्रमात आपण सहभागी व्हावे आणि आपली दांपत्ये सांगून पुरुषोत्तम मासाची पुण्यप्राप्ती करावी, ही विनंती.

**स्थळ : खरे मंगल कार्यालय, सन्मित्र हौसिंग सोसायटी, राजारामपुरी, विद्यापीठ रोड, कोल्हापूर.**

**फोन : ८९८३१८८८८९, ०२३१ - २५३१०४९ / ५६**

**वेळ : शनिवार, दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी**

**सायं. ५ वा. विष्णूपूजन - आरती - प्रसाद व सायं. ७ वा. सामूहिक दाम्पत्य भोजन**

या कार्यक्रमासाठी यजमानांना येणारा खर्च रु. ३,०००/- + ३००/- असा एकूण ३,३००/- येणार असून त्यामध्ये (३ दाम्पत्य) ६ व्यक्तींच्या भोजनाचा खर्च समाविष्ट केला आहे. आपणामार्फत अधिक व्यक्ती निमंत्रित करण्यात येणार असतील तर ६ व्यक्तींपुढे प्रत्येकी ४००/- प्रमाणे जादा खर्च येईल.

**भोजन, दक्षिणा, सुवासिनींची ओटी आदी सर्व खर्च वरील रक्कमेत समाविष्ट आहे.**

**नोंदणीची अंतिम तारीख : दि. १ ऑगस्ट २०२३**

**संपर्कासाठी दूरध्वनी : ०२३१-२५४६२२५, ७६२०५४६२२५ (कोल्हापूर चित्पावन संघ)**

**७५८८८३९५२७ (श्री. केदार जोशी, कार्यवाह) ८४५९०१९०९१ (श्री. संतोष साने, संचालक)**

○ Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly ○
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


**PRINTED BOOK**

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.